रविवार, ११ सप्टेंबर २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ५४
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

स्व. विनायक मेटे यांच्या अस्थिकलशाचे विसर्जन/२
वातावरण बदलाचा सर्वच घटकांवर होतोय परिणाम/३
माजी आमदाराच्या पुतण्याचा आत्महत्येचा प्रयत्न/७

## बालसुधारगृहातील मुलांची तस्करी; टोळीचा पर्दाफाश



**धाराशिव** : बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलांची तस्करी करणाऱ्या टोळीचा धाराशिव पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. या टोळीतील एका महिलेसह दोन जणांना धाराशिव पोलिसांनी अटक केली. त्यांच्याकडून पाच बनावट आधार कार्ड, आठ सिम कार्ड पोलिसांनी जप्त केली आहेत. बालसुधारगृहातील मुलांचे पालक असल्याचा बनाव करीत ही टोळी बालसुधारगृहातील मुलांना पळवित असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. या मुलांना भीक मागणे व मोबाइल चोरी करण्यास भाग पाडले जात होते. राज्यभर ही टोळी सक्रिय असून याची पाळेमुळे खोदण्यासाठी धाराशिव पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. या टोळीतील इतर आरोपींनाही लवकरच अटक केली जाणार असल्याची माहिती धाराशिवचे पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली.

### राज्यातील शेतकऱ्यांना शिंदे-फडणवीस सरकारकडून खुशखबर

# ‘मुख्यमंत्री किसान योजना’ लागू होणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकऱ्यांसाठी शिंदे-फडणवीस सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या धर्तीवर आता राज्यातही मुख्यमंत्री किसान योजना लागू करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या निर्णयानुसार राज्यातील पात्र शेतकऱ्यांना वर्षाकाठी सहा हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे.

सध्या देशपातळीवर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना राबविली जात आहे. त्याच धर्तीवर राज्यातदेखील मुख्यमंत्री किसान सन्मान निधी योजना राबविण्यात येणार आहे. कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत घेतलेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती मिळत



आहे. यानुसार प्रत्येक वर्षी पात्र शेतकऱ्यांना सहा हजार रुपये दिले जातील.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत लहान आणि सीमांत शेतकऱ्यांना सरकारकडून वर्षाला सहा हजार रुपये दिले जातात. ही रक्कम प्रत्येकी दोन हजार रुपयांची असते. वर्षातून तीन वेळा शेतकऱ्यांच्या खात्यावर दोन हजार रुपयांची रक्कम वर्ग केली जाते. हे हप्ते दर चार महिन्यांनी येतात. म्हणजे वर्षातून तीनदा दोन हजार रुपये या योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यावर पाठवले जातात. केंद्र सरकार हे पैसे थेट शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करते. आता राज्य सरकारही मुख्यमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये देणार आहेत. या योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांच्या निकषांबाबत लवकरच निर्णय जाहीर केला जाणार आहे.

## अतिवृष्टीग्रस्तांसाठी तीन हजार ५०१ कोटींचा निधी जिल्ह्यांना सुपूर्द

**मुंबई** : अतिवृष्टीग्रस्तांच्या मदतीसाठी राज्य आपत्ती प्रतिसाद निधी आणि राज्य शासनाच्या निधीतून मिळून तीन हजार ५०१ कोटी निधी जिल्ह्यांना देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मदत व पुनर्वसन विभागाने तसा शासन निर्णय जारी केला आहे.

जून, जुलै, ऑगस्ट २०२२मध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि पूर परिस्थितीमुळे शेतीपिकांचे व शेतजमिनीचे नुकसान झाले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अतिवृष्टीग्रस्तांना वाढीव मदत केली जाईल, अशी घोषणा केली होती आणि त्याप्रमाणे मंत्रिमंडळ बैठकीत निर्णयही घेण्यात आला. याशिवाय राज्यातील ठिकठिकाणच्या पूरग्रस्तांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी कुणाही नुकसानग्रस्तास वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही दिली होती. त्यानुसार राज्य आपत्ती प्रतिसाद निधी आणि राज्य शासनाच्या निधीतून मिळून तीन हजार ५०१ कोटी निधी जिल्ह्यांना देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

वाढीव मदतीमध्ये जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी १३,६०० प्रति हेक्टर, बागायत पिकांसाठी २७ हजार रुपये प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांसाठी ३६ हजार रुपये प्रति हेक्टर अशी तीन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देण्यात येणार आहे.

# गणपती गेले गावाला..!

### भर पावसात बाप्पाला निरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

‘गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या’चा जयघोष करीत लाडक्या गणपती बाप्पाला सर्वत्र भावपूर्ण निरोप देण्यात आला. या वेळी वरुणराजाने हजेरी लावली होती. तरीही गणेशभक्तांचा उत्साह ओसंडून वाहत असल्याचे दिसून आले.



कोरोनाच्या दोन वर्षांच्या निर्बंधानंतर यंदा गणेशोत्सव जल्लोषात झाला. १० दिवस गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते. आनंद आणणारा, वातावरण प्रफुल्लित करणारा गणपती बाप्पा अखेर आपल्या गावी निघाला. या वेळी त्याची विसर्जन स्थळापर्यंत वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती. ढोल-ताशा, बँन्जोच्या तालावर तरुणाई थिरकत होती. अधूनमधून गणरायाचा जयजयकार सुरू होता. बाप्पाचे साजिरे रूप डोळ्यांत साठवत त्याला निरोप देण्यात आला. या वेळी गणेशभक्त भावूक झाल्याचे पाहायला मिळाले.

दरम्यान, गणेश विसर्जनासाठी स्थानिक प्रशासनाकडून व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रमाणे पोलीस बंदोबस्त तैनात होता. त्यामुळे मिरवणुका व विसर्जन शांततेत झाले. सर्वांनी बाप्पाला निरोप दिला.

### २३ तासांच्या मिरवणुकीनंतर लालबागचा राजाचे विसर्जन

**मुंबई** : येथील प्रसिद्ध गणपती लालबागचा राजाचे तब्बल २३ तास चाललेल्या मिरवणुकीनंतर गिरगाव चौपाटीवर विसर्जन झाले. या वेळी समुद्राचे पाणी अंगावर उडवत आणि बोटींच्या माध्यमातून लालबागच्या राजाला मानवंदना देण्यात आली. खास सजावट करण्यात आलेल्या तराफ्यावरून थाटामाटात मूर्ती समुद्रात रवाना झाली. त्यानंतर यांत्रिक तराफ्याच्या सहाय्याने या बाप्पाला खोल समुद्रात निरोप दिला गेला.

### पुण्यातही गणरायाचे विसर्जन करण्यास दुसरा दिवस उजाडला

**पुणे** : राज्यात नव्याने आलेल्या सरकारने यंदा विसर्जन मिरवणुकीवरीलही सर्व निर्बंध उठवल्यामुळे पुण्यात मिरवणूक जोशात झाली. दुसऱ्या दिवशी म्हणजेच शनिवारी (दि. १०) दुपार झाली तरी गणेश विसर्जन मिरवणुका सुरूच होत्या. एकेक मंडळ दीर्घ काळाने येत असताना पोलिसांनी कोणत्याही स्वरूपाची जबरदस्ती केली नाही आणि कारवाईचा बडगाही उचलला नाही.

## राहुलबाबा परदेशी टी-शर्ट घालून भारत जोडण्यासाठी निघालेत!

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाहांचा हल्लाबोल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांच्या भारत जोडो यात्रेवर केंद्रीय गृहमंत्री व भाजप नेते अमित शाह यांनी हल्लाबोल केला आहे. राहुलबाबा परदेशी टी-शर्ट घालून भारत जोडण्यासाठी निघाले आहेत, अशी टीका गृहमंत्री शाह यांनी केली.

राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा सुरू झाल्यापासून त्यांचा विदेशी टी-शर्ट,



ते मुक्काम करणार असलेला कंटेनर व त्यातील सुविधा, वादग्रस्त धर्म प्रसारक जॉर्ज पोन्नय्या यांची घेतलेली भेट आदी गोष्टींवरून राहुल हे ट्रोल होत आहेत.

या पार्श्वभूमीवर गृहमंत्री शाह यांनी ट्वीटमध्ये म्हटलेय की, राहुलबाबा नुकतेच भारत जोडो यात्रेसाठी निघाले आहेत. ते परदेशी टी-शर्ट घालून भारत जोडण्यासाठी निघाले आहेत. राहुलबाबा आणि काँग्रेसजनांना त्यांच्या संसदेतील भाषणाची मी आठवण करून देतो. राहुलबाबा तेव्हा म्हणाले होते की भारत हे राष्ट्र नाही. अहो राहुलबाबा, कुठली पुस्तके वाचलीत? माँ भारती हे ते राष्ट्र आहे, ज्यासाठी लाखो लोकांनी बलिदान दिले आहे.

## निवडक

### गुजरात एटीएसकडून कोलकात्यात ड्रग्ज जप्त

**कोलकाता** : गुजरात दहशतवादविरोधी दल (एटीएस) आणि महसूल गुप्तचर संचालनालयाने (डीआरआय) कोलकाता येथे तब्बल २०० कोटींचे ड्रग्ज जप्त केले आहे. १२ गिअर बॉक्समधून हे ४० किलो ड्रग्ज दुबई येथून भारतात आणले जात असल्याची माहिती गुजरात एटीएसला मिळाली होती. त्यानुसार कारवाई करण्यात आली.

### ज्येष्ठ पुरातत्त्ववेत्ते बी. बी. लाल यांचे निधन

**नवी दिल्ली** : आर्किओलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाचे माजी महासंचालक आणि राम जन्मभूमीच्या ठिकाणी उत्खनन करणारे ज्येष्ठ पुरातत्त्ववेत्ते ब्रज वासी लाल यांचे शनिवारी (दि. १०) निधन झाले. अयोध्येत प्राचीन काळी राम मंदिर होते हे सिद्ध करण्यात लाल यांनी त्या ठिकाणी केलेले उत्खनन महत्त्वाचा आधार ठरले होते. त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.

## शैक्षणिक संस्थांनी कौशल्य प्रशिक्षणावर भर द्यावा

### तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन



**ठाणे : प्रतिनिधी**

पुढील काळात कौशल्य विकास प्रशिक्षण असेल, तरच तरुणांना नोकऱ्या मिळतील. त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी कौशल्य विकास प्रशिक्षण अभ्यासक्रम सुरू करावेत. यासाठी राज्य शासन सर्वतोपरी मदत करेल, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी शनिवारी (दि. १०) येथे केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या वतीने गोवेली येथे आयोजित प्रवचनकार व कीर्तनकारांच्या सत्कार कार्यक्रमात मंत्री पाटील बोलत होते. या कार्यक्रमास आमदार किसन कथोरे, आमदार कुमार आयलानी, नरेंद्र पवार, संस्थेचे संस्थापक रवींद्र घोडविंदे, रेश्मा मगर, अरुण पाटील, चंद्रकांत कोष्टे आदी उपस्थित होते.

या वेळी प्रा. राजाराम कापडी लिखित ग्रंथालय संघटन आणि सुनीलदत्त तवरे लिखित संतांचे तत्त्वज्ञान या दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन मंत्री पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी दृष्टिमित्र साकीब गोरे यांचा सत्कार करण्यात आला. सुविधा केंद्राचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले. कीर्तनकार नवनित्यानंद महाराज उर्फ मोडक महाराज यांच्यासह परिसरातील कीर्तनकारांचा सत्कार करण्यात आला. विविध स्पर्धेत यश मिळविलेल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मंत्रीमहोदयांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## गणेश विसर्जनावेळी शॉक लागून ११ जण जखमी

### पनवेलमधील घटना; परेश ठाकूर यांच्याकडून जखमींची विचारपूस

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील कोळीवाडा विसर्जन घाटावर शुक्रवारी (दि. ९) रात्री लाडक्या बाप्पाला निरोप दिला जात असताना ११ जणांना विजेचा शॉक लागला. जखमींना शहरातील विविध रुग्णालयांमध्ये दाखल करण्यात आले आहे.

पनवेल कोळीवाडा येथील विसर्जन घाटाजवळ गणेशभक्तांना पुरेसा उजेड मिळावा यासाठी जनरेटर लावण्यात आला होता, मात्र मुसळधार पावसामुळे जनरेटरची वायर तुटली आणि विसर्जनासाठी आलेल्या १७ वर्षीय मानस सुनील कुंभार या तरुणाच्या अंगावर पडली. हे पाहून कुटुंबीय त्याला वाचविण्यासाठी गेले असता त्यांनाही विजेचा शॉक बसला. यामध्ये सर्वम पनवेलकर (वय १५), तनिष्का प्रसाद पनवेलकर (९ महिने), दिलीप पनवेलकर (६५), निहाल चोणकर (५), दिपाली पनवेलकर (२४), वेदांत कुंभार (१९), दर्शना दयानंद शिवशिवकर (३६), हर्षद दिलीप पनवेलकर (३१), रितेश पनवेलकर (३८), रूपाली





पनवेलकर (वय ३५) यांना शॉक लागून ते जखमी झाले. त्यांना तातडीने शहरातील विविध रुग्णालयांत दाखल करण्यात आले आहे. यातील अत्यवस्थ असलेल्या मानस कुंभारला नवी मुंबईतील अपोलो रुग्णालयात हलविण्यात आल्याचे वृत्त आहे.

या दुर्घटनेची माहिती मिळताच माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, आयुक्त गणेश देशमुख, पोलीस उपायुक्त शिवराज पाटील, सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनवणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने आदींनी रुग्णालयांत धाव घेत दुर्घटनाग्रस्तांना व त्यांच्या कुटुंबीयांना धीर दिला. नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपीनकुमार सिंह यांनी रात्री उशिरा घटनास्थळी भेट देत पाहणी करून आढावा घेतला. या घटनेचा अधिक तपास सुरू आहे.


# पनवेलकरांना घडणार लालबागचा राजाचे दर्शन

### महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेचा गौरा गणेशोत्सव

**पनवेल : वार्ताहर**

कोरोनाच्या दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पनवेलकरांना लालबागचा राजाचे दर्शन होणार आहे. पनवेलमधील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटनेच्या श्री गौरा गणेशोत्सवानिमित्त लालबागचा राजाची प्रतिकृती पनवेलमध्ये येत्या मंगळवारी (दि. १३) विराजमान केली जाणार आहे. संघटनेचे गौरा गणेशोत्सवाचे यंदा ३०वे वर्ष आहे.

पनवेलमधील महात्मा ज्योतिबा फुले हातगाडी संघटना व फळभाजी विक्रेते सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने गेल्या २९ वर्षांपासून गौरा गणेशोत्सव साजरा केला जात आहे. या संघटनेचे जवळपास तीन हजारांपेक्षा जास्त सभासद असून छोटे-मोठे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करणाऱ्यांचा सहभाग मोठ्या संख्येने आहे. सामाजिक



बांधिलकी जोपासून हा उत्सव भक्तीमय वातावरणात व शांततामय साजरा केला जातो.

गौरा गणेशोत्सव साजरा करण्यामागची संकल्पना सांगताना संघटनेचे अध्यक्ष एस. के. नाईक यांनी सांगितले की, पनवेल तालुक्यात गणेशोत्सव साजरा होत असताना भाविकांना गणरायासाठी आवश्यक असणारे साहित्य विक्री करण्यात येथील व्यावसायिक गुंतलेले असतात. त्यामुळे त्यांना गणेशोत्सव साजरा करता येत नाही. त्यांनाही गणेशोत्सवाचा आनंद घेता यावा यासाठी संघटनेने गौरा गणेशोत्सव साजरा करण्यास सुरुवात केली. ही परंपरा आजतागायत सुरू आहे.

गौरा गणेशोत्सवाच्या प्रारंभी वेगवेगळ्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जात होती, परंतु गेल्या २३ वर्षांपासून लालबागचा राजाची प्रतिकृती पनवेलमध्येच तयार करून प्रतिष्ठापना केली जात आहे. लालबागचा राजाची मूर्ती साकारणारे संतोष कांबळी व त्यांचे सहकारी गेल्या १५ ते २० दिवसापांसून पनवेलमध्ये गणेशमूर्ती साकारण्यासाठी रात्रंदिवस काम करीत आहेत, तर बाप्पाचे धोतर सजवण्याचे काम रूपेश पवार करीत आहेत.

या गणरायाचे दर्शन घेण्यासाठी नवी मुंबई, रायगडसह मुंबई, ठाणे आदी जिल्ह्यांतून पाच लाखांपेक्षा जास्त भाविक आवर्जून येतात. लालबागचा राजाचे दर्शन झाले नाही असे भाविक तसेच पूर्ण झालेल्या मनोकामनेचा नवस फेडण्यासाठी भाविक पनवेलकडे धाव घेतात. हा गौरा गणेशोत्सव साजरा करीत असताना सर्वधर्मिय भाविक जात, पात, वंश, भाषा असे सर्व भेद विसरून एकदिलाने कार्यरत असतात. गणेशोत्सवानिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते, ज्याचा लाभ जवळपास साठ हजारांपेक्षा जास्त गणेशभक्त घेतात, असेही नाईक यांनी सांगितले.



## राज्यात जोरदार पावसाचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

कोकणासह राज्यात गेल्या काही दिवसांपासून दमदार पाऊस बरसतोय. आणखी चार-पाच दिवस जोरदार पाऊस पडणार असल्याचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे.

मुंबईसह ठाण्यात पावसाची तीव्रता १२ सप्टेंबरपासून वाढणार आहे तसेच घाटमाथ्यासह कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. राज्यात पुढील चार ते पाच दिवस मान्सून सक्रिय राहिल, असा अंदाज हवामान विभागाचे प्रमुख कृष्णानंद होसाळीकर यांनी व्यक्त केला आहे.

## माथेरानची माहिती आता एका स्कॅनवर!

- नगर परिषदेकडून ॲप विकसित
- कर संकलनासह पर्यटनाला चालना

**कर्जत : बातमीदार**

माथेरानला आलेल्या पर्यटकांची फसवणूक होते असे सातत्याने बोलले जाते. त्यात पर्यटक प्रवासी कर भरण्यासाठी आल्यानंतर त्यांचा पुढील प्रवास दलाल आणि गाईड यांच्यात अडकून बसतो. तसे होऊ नये आणि पर्यटकांना आपल्या हक्काच्या ठिकाणी सहजपणे जाता यावे यासाठी माहिती देणारे ॲप माथेरान गिरीस्थान नगर परिषदेकडून विकसित करण्यात आले आहे.

आता माथेरानमध्ये प्रवास करताना पर्यटकांनी प्रवासी स्वच्छता कर भरल्यानंतर डिजिटल पावती दिली जाईल आणि त्या पावतीवर असलेला क्यूआर कोड मोबाइलवरून स्कॅन केल्यास माथेरानची इत्यंभूत माहिती मिळणार



आहे. पालिकेच्या मुख्याधिकारी आणि प्रशासक सुरेखा भणगे यांनी पहिली डिजिटल पावती घेत प्रवासी कर संकलन मोहिमेचा शुभारंभ केला. या प्रणालीमुळे महसूल आकारणीत पारदर्शकता येणार असून पर्यटकांना विविध प्रकारची माहितीही उपलब्ध होणार आहे.

# माजी आमदार सदानंद चव्हाण शिंदे गटात

## ■ शिवसेनेवर होती तीव्र नाराजी; अखेर शिवबंधन तोडले

**चिपळूण : प्रतिनिधी**

माजी आमदार सदानंद चव्हाण अखेर शिवबंधन तोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटामध्ये सामील झाले आहेत. आपल्या समर्थकांसह त्यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेऊन पाठिंबा दिला. उद्योगमंत्री उदय सामंत हेही या वेळी उपस्थित होते.



या प्रवेशाबाबत चव्हाण यांनी सांगितले की, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेतली. आगामी काळात चिपळूण मतदारसंघाचा विकास करण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी चर्चा केली. मतदारसंघासाठी ते निधी देणार असतील तर माझा त्यांना पाठिंबा आहे, असे मी त्यांच्याशी बोललो आहे. पुढील दोन वर्षांत चिपळूणसाठी जास्तीत जास्त निधी आणून विकास कामे करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

चिपळूण विधानसभा मतदारसंघातून शिवसेनेच्या तिकिटावर सलग दोन वेळा निवडून आलेले चव्हाण यांनी गेल्या काही महिन्यांत वेळोवेळी अस्वस्थता व्यक्त केली होती. शिवसेना नेते आमदार भास्कर जाधव यांनी २००४ मध्ये पक्ष सोडल्यानंतर चिपळूणमध्ये संपलेली शिवसेना मी उभी केली, असा दावा ते वारंवार करत होते. पण मागील विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर चव्हाण सक्रिय राजकारणापासून दूर होते. गुरुवारी मुख्यमंत्र्यांबरोबरच्या भेटीच्या वेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शशिकांत चाळके, उपतालुकाप्रमुख अभय सहस्त्रबुद्धे, अनंत पवार, युवा सेनेचे माजी तालुकाप्रमुख संदेश आयरे, विभाग प्रमुख बळीराम चव्हाण इत्यादी निवडक कार्यकर्ते उपस्थित होते.

# आमदार गोगावलेंच्या माध्यमातून विकासकामांची गंगा आणणार

## युवासेना जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांचे प्रतिपादन

**माणगाव : प्रतिनिधी**

तळा तालुका शिवसेना-युवासेना शिंदे गटाची आढावा बैठक युवासेना दक्षिण रायगड जिल्हाप्रमुख विपुल उभारे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना शाखा संपर्क कार्यालय तळा येथे झाली. या वेळी उभारे यांनी आमदार भरत गोगावले यांच्या माध्यमातून विकास कामांची गंगा आणणार असल्याचे सांगितले.





आमदार गोगावले यांनी तळा तालुक्यातील प्रस्तावित विकासकामांसाठी दोन कोटी निधीची घोषणा केली असून लवकरच प्रशासकीय मान्यता मिळून कामाला सुरुवात होणार असल्याची माहिती बैठकीत उभारे यांनी दिली.

शिवसेना-भाजप युती सरकारमध्ये येत्या काळात तळा तालुक्यात विकासाची गंगा वाहताना दिसणार आहे, असा विश्वास उभारे यांनी व्यक्त केला.

या बैठकीस तळा तालुकाप्रमुख प्रद्युम्न ठसाल, शिवसेना शहरप्रमुख राकेश वडके, युवा नेते नमित पांढरकामे, नरेश सुर्वे, दिपेश गोळे, रघुनाथ वाघरे, दीपक चिंचालकर, रमेश तांदलेकर आदि यावेळी उपस्थित होते.

# युवासेनेचे सहसचिव रूपेश पाटील यांनी वर्षा निवासस्थानी घेतले गणेश दर्शन



**पनवेल : वार्ताहर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे युवासेनेचे राष्ट्रीय सहसचिव रुपेश पाटील यांनी नुकतेच दर्शन घेतले.

मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी नेते व आमदारांसोबत पदाधिकारी व सर्वसामान्य कार्यकर्त्यांना सुद्धा प्रवेश मिळत होता. यंदाचा गणेशोत्सव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निर्बंधमुक्त करून मंडळांना सहकार्य म्हणून तातडीने प्रशासलाला आदेश देण्यात दिले. तसेच यंदा कमीत कमी एनओसी घेऊन मंडळांना परवानगी दिल्या गेल्याने युवासेनेचे राष्ट्रीय सहसचिव रुपेश पाटील यांनी मुख्यमंत्री यांचे आभार मानले.

# भिवंडी पोलिसांकडून आंतरराज्य टोळी गजाआड

**मुंबई : प्रतिनिधी**

कल्याण-मुंबई-अहमदाबाद, मुंबई-आग्रा महामार्गावर रात्रीच्या वेळेत मालवाहू ट्रक, इतर वाहने पिस्तुलचा धाक, गोळीबार करुन अडवायची. या वाहनांच्या चालकांना बेदम मारहाण करुन ट्रक सामानासह घेऊन पळून जायचे. या वाहनांची काळ्या बाजारात वाहन क्रमांक बदलून विक्री करायचे अशा प्रकारच्या गुन्हेगारी कार्यपध्दतीने महामार्गावरील वाहनांना लुटणाऱ्या ११ जणांच्या एका टोळीला भिवंडी पोलिसांनी कौशल्याने अटक केली आहे.



**महामार्गावर वाहने लुटून फरार होणारे ११ जण अटकेत**

गेल्या काही महिन्यांपासून भिवंडी पोलीस या टोळीचा माग काढत होते. या टोळीचा सुगावा लागल्यानंतर पोलिसांनी दक्षिणी राज्यात आरोपींना शोधण्यासाठी विशेष तपास पथके तयार केली होती. भिवंडी येथून आठ टन तांबे घेऊन एक ट्रक गुजरातच्या दिशेने रात्रीच्या वेळेत गेल्या महिन्यात निघाला होता. या ट्रकला महामार्गावर एका टोळीने अडविले. चालकाला पिस्तुलचा धाक दाखवून हवेत गोळीबार केला. टोळीने चालकाला ट्रक मधून ढकलून देऊन ट्रकचा ताबा घेऊन पळून गेले होते. भिवंडी पोलीस ठाण्यात या प्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. पोलीस उपअधीक्षक जितेंद्र आगरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली साहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, सहाय्यक उपनिरीक्षक पी. के. तोडासे हवालदार एम. एल. काळढोके, ट्रक लुटमारीचा तपास करत होते. हा तपास करताना पथकाला अहमदाबाद मार्गावर अशाच प्रकारचे ट्रक, इतर वाहने लुटमारीच्या घटना घडत आहेत अशी माहिती मिळाली. तपास करताना भिवंडी पोलिसांना मानखुर्द येथे चोरीचे ट्रक पळवून नेले जातात अशी गुप्त माहिती मिळाली. पथकाने मानखुर्द भागात तळ ठोकून तपास सुरू केला. त्यांना इम्रान बन्ने खान (रा. गोवंडी), मोहम्मद एजाज शमाम अन्सारी, धीरजकुमार उमेश चौधरी (रा. मुझ्झफरपूर, बिहार) यांनी एक ट्रक मानखुर्द मध्ये आणला असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी या तिघांचा माग काढून त्यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी महामार्गावर वाहनांवर दरोडे टाकून वाहने, त्यामधील सामान लुटत असल्याची माहिती पोलिसांना दिली. भिवंडी जवळील लुटमारीचा प्रकार या टोळीने केला होता. या आरोपींनी दिलेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी अकरा जणांना अटक केली आहे. या टोळीच्या ताब्यातून एक ट्रक, तीन दुचाकी, रिक्षा अशी वाहने जप्त करण्यात आली आहेत. या टोळीने महाड, नवी मुंबई, रबाळे हद्दीत वाहन चोरीचे प्रकार केले आहेत.

# राज्यपालांच्या हस्ते काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा नवीन पोसरी व्यापारी असोसिएशनचे उपाध्यक्ष मनोज सोमाणी यांच्या धर्मपत्नी निलम सोमाणी यांच्या उपहार या काव्यसंग्रहाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी निलम सोमाणी यांनी राजभवनात कविता वाचनही केले. त्यांच्या काव्यसंग्रहातील कवितांची मांडणी पाहून राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी कौतुक केले. या वेळी आमदार राजहंस सिंह, प्रवक्ते उदयप्रताप सिंह, आरटी आय कार्यकर्ते अनिल गलगली, जयप्रकाश सिंह, आदित्य दुबे, रोहित सिंह आदी उपस्थित होते.उपहार या कवितासंग्रहात एकूण ५० कवितांचा समावेश आहे.

दरम्यान, या काव्यसंग्रहातील कविता मनाला भावून टाकतात. मोहोपाड्यातील निलम मनोज सोमाणी यांच्या उपहार काव्यसंग्रहाचे प्रकाशन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते झाल्याने त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू आहे.

# स्व. विनायक मेटेंच्या अस्थिकलशाचे विसर्जन

## नाशिकच्या रामकुंडावर अमर रहे, अमर रहेच्या घोषणा

**नाशिक : प्रतिनिधी**

शिवसंग्राम संघटनेचे अध्यक्ष माजी आमदार विनायक मेटे यांचे नुकतेच अपघाती निधन झाले. मराठा आरक्षण बैठकीसाठी मुंबईच्या दिशेने जात असतांना मुंबई-पुणे महामार्गावर अपघाती निधन झाले. अंत्यसंस्कार झाल्यानंतर त्यांच्या अस्थी कलशाची यात्रा दर्शनासाठी विविध जिल्ह्यात नेण्यात आली होती. त्यामुळे अस्थी कलशाचे विसर्जन झालेले नव्हते. ते शनिवारी नाशिकच्या रामकुंडावर करण्यात आले.

२२ ऑगस्टला विनायक मेटे यांचा अस्थी कलश नाशिकमध्ये आणण्यात आला होता. मेटे यांच्या पत्नी, भाऊ, नातेवाईक यांच्यासह शिवसंग्राम संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते अस्थी कलश विसर्जनावेळी उपस्थित होते.



विनायक मेटे यांच्या पत्नी डॉ. ज्योती विनायक मेटे, रामहरी मेटे आणि परिवारातील सदस्य यांच्या हस्ते यावेळी अस्थी कलश पूजा करण्यात आली. डॉ. ज्योती मेटे नाशिकमध्ये महसूल विभागात सहनिबंधक या पदावर कार्यरत आहे.

मेटे यांचा नाशिक येथे कायम दौरा असल्याने कार्यकर्त्यांचा ज्योती मेटे यांच्याशी ही परिचय होता. त्यांना सांत्वनपर भेट देण्यासाठी अनेक कार्यकर्ते रामकुंडावर उपस्थित होते. मात्र, या वेळी विनायक मेटे यांचे निकटवर्तीय अमित जाधव यांच्या निवासस्थानी पिंपळगाव खांब येथे ही सांत्वनपर भेट आयोजित करण्यात आली होती.

दरम्यान, नाशिकच्या रामकुंडावर अस्थी कलश विसर्जन करण्याची परंपरा आहे.

# मुंबईचा ऋषी बालसे 'नीट'मध्ये राज्यात पहिला

**पुणे : प्रतिनिधी**

वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमासाठीच्या राष्ट्रीय प्रवेश पात्रता परीक्षेचा (नीट) निकाल राष्ट्रीय परीक्षा मंडळाने (एनटीए) बुधवारी रात्री उशिरा जाहीर केला. त्यात देशातील पहिल्या ५० विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीमध्ये मुंबईच्या ऋषी बालसे याने ७१० गुणांसह देशात सहावा आणि राज्यात पहिला क्रमांक पटकाविला. परीक्षेत जवळपास ५६ टक्के विद्यार्थी पात्र ठरले असून, राज्यातून पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. प्रवेशासाठी आवश्यक पात्रता गुणांमध्ये (कटऑफ) गेल्यावर्षीच्या तुलनेत घट झाल्याचे दिसून येते.

एनटीएने प्रसिद्धिपत्रकाद्वारे निकाल जाहीर केला. निकाल बुधवारी सायंकाळी जाहीर होण्याची शक्यता असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये निकालाविषयी उत्सुकता होती. मात्र तो सायंकाळी जाहीर न होता रात्री उशिरा जाहीर झाला. यंदा नीटसाठी नोंदणी केलेल्या १८ लाख ७२ हजार ३४३ विद्यार्थ्यांपैकी १७ लाख ६४ हजार ५७१ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. त्यातील ९ लाख ९३ हजार ६९ विद्यार्थी पात्र ठरले. परदेशातील १४ शहरांसह एकूण ४९७ शहरांतील ३ हजार ५७० केंद्रांवर परीक्षा घेण्यात आली.

दरम्यान, निकालामध्ये ४ लाख २९ हजार १६० मुले, ५ लाख ६३ हजार ९०२ मुली, तर सात तृतीयपंथी पात्र ठरल्याचे एनटीएने नमूद केले. राज्यातून दोन लाख ४४ हजार ९०३ विद्यार्थ्यांपैकी एक लाख १३ हजार ८१२ विद्यार्थी पात्र ठरले.

# सीरम इन्स्टिट्यूटची एक कोटींची फसवणूक

**पुणे : प्रतिनिधी**

सीरम इन्स्टिट्यूटचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांच्या नावाने समाजमाध्यमावर बनावट माहिती पाठवून सीरम इन्स्टिट्यूटला तब्बल एक कोटी रुपयांना गंडा घालण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार सात ते आठ सप्टेंबर दरम्यान घडला आहे. याबाबत सीरम इन्स्टिट्यूटचे वित्तीय अधिकारी सागर कित्तुर (४४, रा. कोंढवा) यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर कित्तुर हे सीरम इन्स्टिट्यूटमध्ये वित्तीय व्यवस्थापक आहेत. तर सतीश देशपांडे हे कंपनीचे संचालक आहेत.

आदर पूनावाला हे कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी असून त्यांच्या नावे बनावट संदेश देशपांडे यांना पाठविण्यात आले. त्यात काही बँक खात्यांचे तपशील देऊन त्यावर तत्काळ पैसे पाठविण्यास सांगितले. संदेश खरे वाटल्याने कंपनीच्या खात्यावरुन विविध बँक खात्यावर एकूण १ कोटी १ लाख १ हजार ५५४ रुपये पाठविण्यात आले. त्यानंतर कंपनीची फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने फिर्याद देण्यात आली आहे.



# प्राचार्य साधना डोईफोडे यांचे अभीष्टचिंतन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्य साधना डोईफोडे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यालयातील सेवक व विद्यार्थ्यांनी त्यांचे अभीष्टचिंतन करून शुभेच्छा दिल्या.

रयत शिक्षण संस्थेमध्ये अध्यापिका, पर्यवेक्षिका आणि आता मुख्याध्यापिका अशा विविध पदांवर सलग ३० वर्षांपासून प्रदीर्घ सेवा देणाऱ्या साधना डोईफोडे या विद्यार्थीप्रिय अध्यापिका आणि अध्यापकप्रिय मुख्याध्यापिका म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागात प्रसिद्ध आहेत. शुक्रवारी अनंत चतुर्दशी निमित्त विद्यालयास सुटी असल्यामुळे आदल्या दिवशीच त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

या वेळी 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, जे. एच. माळी, अपर्णा देवकुळे, उर्मिला म्हात्रे, हर्षला पाटील तसेच विद्यार्थिनी सानिया पाटील, ललिता पुरोहित, भाविका कोळी आदींच्या अभीष्टचिंतन कार्यक्रम झाला.

**दुखवटा**

## मधुकर वारदे



**पनवेल :** तालुक्यातील उसर्ली गावाचे माजी सरपंच संभाजी वारदे यांचे वडील मधुकर वारदे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. ते वय ९५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, नातवंडे, पंतवडे असा परिवार आहे.


**सांस्कृतिक कट्टा**

वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल

**एक सरमयी शाम**

(१७ सप्टेंबर, सायं.६.३० वा.)

## बाप्पाला निरोप



मुंबई : दहा दिवसांनंतर गणरायाला भावपूर्ण वातावरणात निरोप देण्यात आला.

## निवडक

### पनवेलमधून तरुणी बेपत्ता

**पनवेल :** शहर परिसरातून एक तरुणी बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. देविका रमेश वाघ (वय १९) असे बेपत्ता तरुणीचे नाव असून तिचा रंग सावळा, उंची पाच फुट दोन इंच, केस मध्यम काळे, डोळे काळे, नाक सरळ, पायात सॅण्डल, अंगात लाल टॉप व पांढरी लेगीन्स असून तरुणीला मराठी, हिंदी भाषा बोलता येते. या तरुणीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदीप नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### इमारतीवरून पडून एकाचा मृत्यू

**पनवेल :** १४व्या मजल्यावर काम करीत असलेल्या एका कामगाराचा तोल जाऊन खाली पडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नवीन पनवेल परिसरात घडली आहे. नवीन पनवेल येथील प्रजापती ओरनेट या इमारतीच्या १४व्या मजल्यावर खिडकीला मार्बल लावण्याचे काम निमजारू जमीर शेख (वय २६) हा त्याच्या सहकाऱ्यासह करीत होता. या वेळी अचानकपणे त्याचा तोल जाऊन तो खाली पडला त्यात तो जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल केले, मात्र त्याचा मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### पनवेलमधून तरुण बेपत्ता



**पनवेल :** शहर परिसरातून एक तरुण बेपत्ता झाल्याने तो हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रतिक राजेश गायकवाड (वय २५) असे बेपत्ता तरुणाचे नाव असून त्याची उंची पाच फुट तीन इंच, रंग सावळा, चेहरा गोलाकार, नाक पसरट, केस काळे कुरळे, अंगात पांढरा शर्ट, काळी जिन्स पॅन्ट, पायात राखाडी रंगाचे सॅन्डल तसेच ॲक्टीव्हा दुचाकी सोबत आहे. त्याला मराठी व हिंदी भाषा बोलता येते. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा पोलीस हवालदार संदीप नवले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश



**पनवेल : महापालिका आयुक्त गणेश देशमुख यांनी घरच्या घरी शाडू मातीपासून बनविलेल्या गणेशमूर्तीचे घरामधील कृत्रिम हौदात विसर्जन केले. आयुक्तांनी घरामध्ये पर्यावरणपूरक गणपतीची प्रतिष्ठापना केली होती व गणपतीचे विसर्जनदेखील पर्यावरणपूरक पद्धतीने केले.**



**पनवेल : उलवे येथील शितल महेश सोमासे यांच्या घरात स्थानापन्न गणराय.**



**उरण : बोकडविरा येथील भाजप कार्यकर्ते शशिकांत रामभाऊ पाटील यांच्या घरात विराजमान झालेला गणपती बाप्पा.**

दिवसा ऊन, सायंकाळी विजेच्या गडगडाटांसह पाऊस

# वातावरण बदलाचा सर्व घटकांवर परिणाम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दिवसेंदिवस वातावरणात मोठ्या प्रमाणावर उष्णता निर्माण होत असल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. मात्र दुपारी जरी उन्हाचे चटके बसत असले तरीसुद्धा सायंकाळी वातावरणात अचानकपणे बदल होऊन विजेच्या गडगडात पावसाचे मोठ्या प्रमाणात आगमन होत आहे. वातावरणात बदल घडत असल्यामुळे खोकला, सर्दी, तापाने डोके वर काढल्याने अनेकांना डॉक्टरांचा सल्ला घ्यावा लागत आहे.

दरम्यान, दुपारी कडक उन्हाचे चटके, सायंकाळी गार पाऊस आणि पहाटे धुके जणू शॉवरच्या प्रमाणात निर्माण होत असल्यामुळे तिन्ही ऋतू जणू एकाच वेळी निर्माण झाल्याचा भास प्रत्येकाला जाणवू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून उन्हाची तीव्रता जाणवत असल्यामुळे प्रदूषण, तापमानात वाढ व अन्य कारणांमुळे निसर्गाचे चक्र अनियमीत फिरू लागले आहेत. कोणता ऋतू कधी येईल कसा याचा अंदाज नाही. त्याप्रमाणेच रात्री हवेमध्ये थोडासा गारवा असला तरी दिवसा मात्र उन्हाच्या झळा बसत आहेत. सकाळी ९ वाजल्यापासूनच उन्हाचे चटके जाणवत आहेत. यामुळे पत्र्याच्या घरात वास्तव्य करणाऱ्या लोकांची परवड होत असल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहे. मात्र सायंकाळी पावसाचा जोरदार बॅटिंग निर्माण होत असल्यामुळे शेतकरी चांगलाच धास्तावले आहे. पावसामुळे तोंडाशी आलेला घास जाण्याची भिती शेतकरी व्यक्त करीत आहे.

पावसाचे तांडव मोठ्या प्रमाणावर निर्माण होत असल्यामुळे अनेकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. शिवाय नोकर चालक वर्गाची मोठी धांदल निर्माण झाली आहे. आकाशात अचानकपणे ढग निर्माण होऊन गेल्या काही दिवस पाऊस येत असल्यामुळे शेतकरी राजा चिंताग्रस्त झाला आहे.

(छाया : राकेश खराडे)



## कामोठ्यात अत्याधुनिक इंटेरिअर स्टुडिओ





### भाजप नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर ३१ येथे नव्याने आस्पा इंडिया या नावाने इंटेरिअर एक्सटेरियरचे काम करणारे होलसेल स्टुडिओ सुरू झाले आहे. अनुप गुप्ता यांनी हा स्टुडिओ सुरू केला असून याचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १०) उद्घाटन झाले. या वेळी त्यांनी अनुप गुप्ता यांच अभिनंदन करत व्यवसायाच्या पुढील यशस्वी वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

कामोठे येथे नव्याने सुरू झालेल्या या होलसेल स्टुडिओमध्ये लक्सरी होम फर्निचर, मॉडर्न ऑफिस फर्निचर या सोबतच सर्व प्रकारचे इंटेरिअर आणि एक्सटेरिअरसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू उपलब्ध होणार असून सर्व वस्तू वॉटरप्रूफ, तसेच आग प्रतिरोधक असणार आहेत. या मध्ये फर्निचरसाठी लागणारे सर्व प्रकारचे पॅनल, फॉल्स सीलिंगसाठी लागणारे पॅनल, तसेच पीव्हीसी डोर, डब्ल्यूपीसी डोर व इतर सर्व वस्तू उपलब्ध असणार आहेत.

या स्टुडिओच्या उद्घाटनावेळी भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, शहर युवा मोर्चा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, कंपनीचे मालक अनुप गुप्ता, सहकारी भगवान गोवारी, श्री शिवकृपा इंटरप्रायजेसचे मालक यासीन खान, आलम खान, प्रभात पर्व न्यूजचे कार्यकारी संपादक सागर राजे, प्रल्हाद गायकवाड आदी उपस्थित होते.

## विवाहितेला ब्लॅकमेल करणारा अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

सोशल मिडीयावर अश्लिल फोटो व्हायरल करण्याची भिती दाखवून खारघरमधील विवाहितेकडून तब्बल १२ लाख ५८ रुपये किमतीचे दागिने आणि रोख रक्कम उकळून विवाहितेला धमकावून तिच्याकडून आणखी रोख रक्कम घेण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका खंडणीखोराला खारघर पोलिसांनी हिमाचल प्रदेशमध्ये जेरबंद केले आहे. नवीन श्यामदेव कश्यप (वय २४) असे या खंडणीखोराचे नाव असून मागील काही महिन्यांपासून तो विवाहितेला त्रास देत होता.

घटनेतील २५ वर्षीय विवाहिता खारघरमध्ये राहण्यास आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये या विवाहितेची मिनाक्षी नामक महिलेसोबत इन्स्टाग्रामवरून ओळख झाली होती. त्यानंतर या दोघींमध्ये घनिष्ठ मैत्री झाल्यानंतर मिनाक्षीने तक्रारदार विवाहितेला आपले अश्लिल फोटो पाठवून तिच्याकडून तिचे अश्लिल फोटो मागवून घेतले. त्यानुसार या विवाहितेनेदेखील मिनाक्षीला आपले नग्न अवस्थेतील फोटो पाठवून दिले, मात्र त्यानंतर मिनाक्षीने या विवाहितेचे अश्लिल फोटो तिचे मित्र सचिन मिना आणि नवीन कश्यप या दोघांना पाठवून दिले. सचिन आणि नवीन या दोघांनी विवाहितेला तिचे फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. त्यानंतर या दोघांनी विवाहितेसोबत मैत्री केली. काही महिन्यांपूर्वी आरोपी नवीन कश्यप नवी मुंबईत खारघर येथे तिला भेटण्यासाठी आला होता. त्यावेळी त्याने विवाहितेला कोल्ड्रींक्स मधून नशेचे पेच पाजून तिच्यासोबत अश्लिल चाळे करतानाचे फोटो काढून घेतले. त्यानंतर नवीन कश्यप याने त्याच्या सोबतचे अश्लिल फोटो आणि मिनाक्षीने पूर्वी त्याला दिलेले फोटो सोशल मिडीयावर व्हायरल करण्याची धमकी देऊन तिच्याकडून पैसे उकळण्यास सुरुवात केली. तिच्याकडून तब्बल १२ लाख ५८ हजार रुपये किमतीचे दागिने आणि रोख रक्कम उकळले. त्रस्त झालेल्या या विवाहितेने ऑगस्ट महिन्यात याबाबतची माहिती आपल्या पतीला देऊन खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

खारघर पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन खंडणीखोराचा ठावठिकाणी शोधला. त्यानुसार नवीन कश्यप हिमाचल प्रदेशात असल्याची माहिती मिळाल्यानंतर हिमाचल प्रदेश येथे पोलीस पथक पाठविण्यात आले होते. या पथकाने आरोपी नवीन कश्यप याचा शोध घेऊन त्याला अटक केली आहे.

## पनवेलमध्ये भाजपची सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त पनवेल भारतीय जनता पक्ष सांस्कृतिक सेलतर्फे तसेच भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आणि पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आली असून या स्पर्धेला उत्सफूर्द प्रतिसाद लाभला.

ही स्पर्धा पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी मर्यादित होती. या स्पर्धेचे परीक्षण हे ऑफलाइन स्वरुपात असून आयोजकांच्या परिक्षक पॅनेलने महापालिका क्षेत्रातील सहभाग घेतलेल्या मंडळाला प्रत्यक्ष भेट देऊन परीक्षण केले. तसेच त्यांना सन्मानचिन्ह दिले. या स्पर्धेत ३५ मंडळांनी सहभाग घेतला असून प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या मंडळास १५ हजार रुपये व सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांकास १० हजार रुपये व सन्मानचिन्ह तर तृतीय क्रमांकास पाच हजार रुपये व सन्मानचिन्ह अशी भरघोस रक्कमेची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेच्या परिक्षणावेळी भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन सहसंयोजक गणेश



जगताप, संजीव कुलकर्णी, शहराध्यक्ष निखिल गोरे, सदस्य कौस्तुभ सोमण, अमोल खेर, रितु परणा व तसेच परीक्षक मंडळ सोबत उपस्थित होते.



**पनवेल : मुंबई-गोवा महामार्गावरील तारा येथे नायरा हा पेट्रोल पंप कॉन्टेक बिल्डवेल इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडचे मालक गुरपाल सिंग मथारू यांनी सुरू केला असून या पेट्रोल पंपाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी करण्यात आले. या वेळी पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सिंग कुटुंबांतील सदस्य उपस्थित होते.**

## आदई तलाव येथे इनरव्हील क्लबतर्फे स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांच्या वतीने आदई तलाव येथे गणपती विसर्जन करण्यासाठी येणाऱ्या भक्तांकडून प्लास्टिक व कचरा जमा केला व त्याचे निर्मूलन केले.

गणपती विसर्जनाच्या वेळी बऱ्याच वेळा प्लास्टिक युक्त कचरा हा तलावाच्या परिसरात राहून जातो त्यामुळे प्रदूषण होते. इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष संजीवनी मालवणकर यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.



या वेळी क्लबच्या माजी अध्यक्ष मिनल टिपणीस, क्लबच्या एडिटर डॉ. वीणा मनोहर, सदस्य वंदना बडगुजर, रूबी बोरकर, अंजली कुलकर्णी, ॲड. अपर्णा नादगवंडी आदी उपस्थित होते. तसेच स्थानिक मंडळाचे कार्यकर्ते शिवाजी भागत, भगवान बडगुजर, आशा शेट्टी, सुनील सुरेश, सुनील सिन्हा यांचा क्लबच्या वतीने सत्कार करण्यात आला. परिसरातील कचरा जमा केला असून कोणीही प्लास्टिक युक्त कचरा टाकू नये, असे आवाहन या वेळी क्लबच्या वतीने करण्यात आले.

## पराग उत्तमराव बेडसे यांची निवड



**पनवेल :** शहरातील लाईफ लाईन हॉस्पिटलचे डायरेक्टर पराग उत्तमराव बेडसे यांची साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी, साक्री (जि. धुळे) या नामांकित संस्थेच्या अध्यक्ष पदी बिनविरोध फेरनिवड झाली. तसेच सेक्रेटरी पदी अनिल सोनवणे यांची बिनविरोध निवड झाली.

साक्री तालुका एज्युकेशन सोसायटी साक्री ही संस्था १९४० साली स्थापन झाली असून संस्था गेल्या ८२ वर्षापासून धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागात तसेच औरंगाबाद येथे बहुजन समाजाच्या, दलित-आदिवासींच्या, कष्टक-यांच्या मुला-मुलींच्या शिक्षणासाठी शिक्षण प्रसाराचे कार्य करीत आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विद्यार्थी हाच केंद्र बिंदू मानून संस्थेचे कामकाज चालले आहे. संस्थेच्या एकूण ३५ विद्याशाखा आहेत.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धेचे बक्षीस वितरण

**उरण : बातमीदार**

श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे उरण तालुका मर्यादित पर्यावरण पूरक गणेशोत्सव स्पर्धा २०२२ या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेत उरण तालुक्यातील उरण शहरा मधील कोटनाका येथील राजे शिवाजी मित्र मंडळाला प्रथम क्रमांक, देऊळवाडी येथील देऊळवाडी युवक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाला दुसरा क्रमांक तर कामठा येथील जय शिवराय मित्र मंडळाच्या गणेशोत्सवला तिसरा क्रमाकांने गौरविण्यात आले. घरगुती स्पर्धेत कळंबुसरे येथील क्षितिज म्हात्रे यांना प्रथम क्रमांक, कोप्रोली येथील सचिन म्हात्रे यांना द्वितीय क्रमांक, शैलेश म्हात्रे खोपटे यांना तृतीय, तर परेश घरत जासई, प्रेमकुमार म्हात्रे गोवठणे यांना उत्तेजनार्थ बक्षीस देण्यात आले.

विजयी सर्व घरगुती स्पर्धकांना व सार्वजनिक विजयी गणेशोत्सव मंडळांना शाल, गुलाब पुष्प, सन्मानचिन्ह देऊन बक्षीसांचे वितरण करण्यात आले. या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे सहसचिव अभय पाटील, सहसंपर्कप्रमुख सादिक शेख, खोपटे गाव अध्यक्ष सागर घरत, सदस्य नितेश पवार आदी उपस्थित होते.



# कर्ज देणाऱ्या ‘ॲप सावकारी’पासून सावधान!

**डिजिटल व्यवहार सोपे असल्यामुळे ते वाढत आहेत, हे स्वागतार्ह आहे. मात्र त्याचाच फायदा घेऊन झटपट कर्ज देऊन त्यात फसवणूक करणारे ॲप वाढत चालले आहेत. या मार्गाने अनेक आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचे लक्षात आल्याने सरकारने त्यांच्यावर निर्बंध लादले आहेत. मात्र नागरिक या नात्याने आपली त्या मार्गाने फसवणूक होणार नाही, याची काळजी आपणच घेतली पाहिजे.**

अर्थ प्रहर

यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)

वर्षानुवर्षे बँकिंग व्यवस्था सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोचली नसल्याने कोट्यवधी भारतीयांना कर्जासाठी सावकारांवरच अवलंबून राहावे लागले. बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले तेव्हा म्हणजे १९६९मध्ये बँकिंग अधिकाधिक नागरिकांपर्यंत पोचविण्याचा उद्देश ठेवण्यात आला होता. पण नंतरच्या ४५ वर्षांत त्या प्रयत्नांना गती मिळू शकली नाही. त्यामुळे बँकाचा लाभ हा देशातील ठराविक नागरिकांनाच लाभ देणारी व्यवस्था ठरली. २०१४मध्ये जन धन खाती उघडण्याची देशव्यापी मोहीम हाती घेण्यात आली, तिचे चांगले परिणाम आता दिसू लागले आहेत. २०१४मध्ये ५० टक्के नागरिक बँकिंग करत होते, ती संख्या गेल्या आठ वर्षांत ७० टक्क्यांवर गेली आहे. जन धन खात्यांच्या मदतीने ४६.४० कोटी नागरिक बँकिंगशी जोडले गेले आहेत. बँकिंग पोचविण्यासाठी सरकारतर्फे करण्यात आलेले प्रयत्न आणि बँकिंग करण्यासाठी इच्छुक असलेल्या जनतेने आर्थिक सामिलीकरणाचा हा जगातील सर्वात मोठा प्रयत्न यशस्वी केला. अर्थात, असा मोठा बदल जेव्हा कमी कालावधीत होतो, तेव्हा त्याच्या संदर्भातील काही आव्हानांनाही तोंड द्यावे लागते. कर्ज देणारी अनधिकृतॲप हे असेच आव्हान सध्या आपल्या समोर उभे राहिले आहे.

### बदल स्वागतार्ह, पण धोकाही

गुगलच्या प्ले स्टोअरवर हजारोॲप उपलब्ध आहे, हे आपण जाणतो. त्यातील जी आर्थिक विषयाची ॲप आहेत, ती नागरिकांना कर्ज देण्याची सुविधा देणारी आहे. खरे म्हणजे डिजिटल क्रांतीचा फायदा अशा मार्गांनी मिळणे, ही आजची गरजच आहे. त्यामुळे अशा बदलाचे स्वागतच केले पाहिजे. पण भारतीय नागरिकांची कर्जाची सततच गरज लक्षात घेवून काही समाज कंटक या व्यवसायात घुसले आहेत. त्यांनी अशी ॲप तयार केली असून त्या माध्यमातून काही मिनिटांत घरबसल्या कर्ज मिळण्याची सुविधा उपलब्ध केली आहे. कर्ज घेणारा हा गरजू असतो, त्याला पैसे मिळविण्याची घाई असते, हे लक्षात घेवून या लोकांनी त्या ॲपची रचना केलेली असते. कोणत्याही कागदपत्रांशिवाय कर्ज मंजूर होते, ही त्याला नवलाई तर वाटतेच, पण त्याची गरजही पूर्ण होते. त्यामुळे तो त्या कर्जाच्या अटी न वाचताच कर्ज घेण्यास प्रवृत्त होतो. अर्ज मिळण्याच्या अटी जाचक आहेत, हे त्याला कर्ज फेडतानाच लक्षात येते. भरमसाट व्याज आणि वेळेवर कर्ज न फेडल्यास व्याजावर व्याज तसेच कर्जहप्ते देण्यास दिरंगाई केल्यास जबरी दंड–अशी ती पद्धत असते. पूर्वी सावकार जसे अव्वाच्यासव्वा व्याज आकारत असत आणि दामदपटशहा करून ते वसूल करीत असत, तीच पद्धत येथे अवलंबण्यात येते आहे. याचा अर्थ ही ‘नवी ॲप सावकारी’ च म्हटली पाहिजे.

### रिझर्व बँकेची भूमिका महत्त्वाची

गेली तीन चार वर्षे फोफावलेल्या याप्रकाराची झळ अनेक नागरिकांना बसली असून अशा नागरिकांनी तक्रार करण्यास सुरवात केल्यावर सरकार आणि रिझर्व बँकने ही बाब गांभीर्याने घेतली आहे. आता अशा ॲपची नोंद गुगल स्टोअरवर होणार नाही, अशी काळजी इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्फोर्मेशन तंत्रज्ञान मंत्रालय घेते आहे. त्याचा पहिला टप्पा म्हणजे ॲपमार्फत कर्ज देणाऱ्या संस्थांना त्यासाठी रिझर्व बँकेची परवानगी घ्यावी लागेल.रिझर्व बँक पुढील काळात अशा ॲपची यादीच वेबसाईटवर जाहीर करेल. पूर्वी ज्यांची फसवणूक झाली आहे, अशांकडून माहिती घेवून अशा कंपन्यांवर कारवाई केली जात आहे.




या प्रकारात काही बोगस कंपन्या घुसल्या असून त्यांच्यावर कार्पोरेट अफेअर मंत्रालय कारवाई करीत आहे. पुरेशा बँकिंग सुविधा अजूनही उपलब्ध नसल्याने नॉन बँकिंग कंपन्यांची संख्या वाढली आहे. अशा कंपन्यांच्या मागे लपून मनी लॉँड्ररिंगचे प्रकार वाढीस लागत आहेत, हे लक्षात आल्यावर अशा कंपन्यांवरील निर्बंध कडक केले जात आहेत.

### अशा ६०० ॲपचा छडा

अलीकडेच सुरु झालेला हा प्रकार किती वेगाने फोफावतो आहे, पहा. गेल्या वर्षी रिझर्व बँकेने यावर काम करण्यासाठी एक कार्यकारी गट स्थापन केला होता. या गटाने अशा तब्बल ६०० ॲपचा छडा लावला. आर्थिक फसवणुकीच्या तक्रारीसाठी रिझर्व बँकेचे सचेत हे पोर्टल आहे. त्याच्यावर जानेवारी २०२० ते मार्च २०२१ या दरम्यान कर्ज देणाऱ्या ॲपविषयीच्या दोन हजार ६०० तक्रारी दाखल झाल्या होत्या, यावरून या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात येते. अलीकडेच रोझापे, पेटीएम आणि कॅश फ्री ॲपच्या बंगळूर येथील कार्यालयाची या संदर्भाने तपासणी करण्यात आली आहे.

झटपट कर्ज देणाऱ्या काही ॲपचे नियंत्रण चीनमधून करण्यात येते, असेही उघडकीस आले आहे. त्यामुळे अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी ९ सप्टेंबरला बैठक घेवून इलेक्ट्रॉनिक्स आणि इन्फोर्मेशन तंत्रज्ञान मंत्रालय, कार्पोरेट अफेअर मंत्रालय आणि रिझर्व बँक अशा तीनही यंत्रणांना यासाठी एकत्रित काम करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अर्थात, हे झाले सरकारचे प्रयत्न. पण अशी फसवणूक करणारी मंडळी नेहमीच कायद्याच्या एक पाउल पुढे असतात. त्यामुळे नागरिकांनी जागरूक रहाणे, हाच असे प्रकार कमी करण्याचा खरा मार्ग आहे.

### नागरिकांच्या जागरूकतेची गरज

झटपट कर्जदेणारे ॲप का फोफावले, हे समजून घेतले की ते रोखण्याचा खरा मार्ग सापडू शकतो. भारतीय बँका कर्ज देतानाच्या नियम–अटी जितक्या सोप्या सुटसुटीत करतील, तितका त्यांचा व्यवसाय तर वाढेलच, पण ग्राहकांची मोठी सोय होईल. ते बँकेच्या कार्य कक्षेच्या बाहेर कर्ज मागण्यासाठी जाणारच नाहीत.
गेल्या काही दिवसात बँकांकडून कर्ज घेणाऱ्या ग्राहकांची संख्या वेगाने वाढली असली तरी भारतीय नागरिकांची गरज बँका आजही भागवू शकत नाहीत. त्यामुळेच नॉन बँकिंग कंपन्यांची वाढ होताना दिसते आहे. त्यांच्या स्पर्धेत बँकांचे काम सुधारते आहे.
मात्र त्या दरम्यान बँकिंगच्या बाहेर जाऊन गैरव्यवहार होत असतील तर ते रोखलेच गेले पाहिजेत. ते रोखण्याचे काम सरकार करेल, पण आपण आपली आणि आपल्या परिचितांची फसवणूक होणार नाही, याची काळजी घेतलीच पाहिजे. मोठ्या बँका आणि चांगल्या नॉन बँकिंग कंपन्यांनीही असे झटपट कर्ज देणारी ॲप काढली असून त्याचा मात्र आपण फायदा घेतला पाहिजे. याचा अर्थ ॲपवरून कर्ज घ्यायचेच नाही, असा नसून अनधिकृत ॲपकडून कर्ज घ्यायचे नाही, असा संकल्प आपण केला पाहिजे.

---

# ‘सुवर्ण गुणोत्तर’चा वापर शेअर बाजारात असा होतो

**मागील लेखात आपण फिबोनाच्या संख्येबद्दल जाणून घेतले होते. आजच्या लेखात आपण शेअर बाजार या सुवर्ण गुणोत्तर म्हणजेच गोल्डन रेश्योशी कसे जोडलेले आहेत आणि याचा आपण एक ट्रेडर अथवा गुंतवणूकदार म्हणून कसा उपयोग करून घेऊ शकतो हे जाणून घेऊयात.**



प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com

आपण जाणतोच आहोत की, गोल्डन रेश्यो हे प्रमाणबद्धता आणि सममितीची नैसर्गिक मूलतत्व आहे ज्याला फिबोनाची अनुक्रम म्हणतात. गोल्डन रेशो, ज्याला Phi असेही संबोधले जातं, जे हे मानवी चेहऱ्यापासून ते निसर्गातील कोणत्याही गोष्टीवर लागू होऊ शकतं. शेअर बाजारातदेखील विश्लेषक गोल्डन रेशोचा वापर संपूर्ण बाजारासाठी किंवा विशिष्ट शेअर्ससाठी प्रमुख किमतीच्या हालचालींचे ट्रेंड तपासण्यासाठी करतात. तेराव्या शतकातील पिसाचे गणितज्ञ फिबोनाची, सशांबद्दलच्या गणिताच्या समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करताना, नैसर्गिक वाढीच्या चक्रांची नक्कल करणाऱ्या संख्यांच्या क्रमात अडखळले. ही फिबोनाची मालिका खालील प्रमाणे आहे १, २, ३, ५, ८, १३, २१, ३४, ५५, ८९, १४४ ... अनंतापर्यंत. ८ नंतरची प्रत्येक संख्या मागील संख्येच्या १.६१८ पट आणि पुढील संख्येच्या ०.६१८ पट असते आणि याला सामान्यतः सुवर्ण गुणोत्तर म्हणतात हे आपण पाहिलंच. फिबोनाची क्रमवारीत दोन सलग संख्या घेतल्यास आणि दुसऱ्या क्रमांकाला पहिल्या संख्येने विभाजित केल्यास आपण सुवर्ण गुणोत्तराच्या १.६१८ या सर्वात मोठ्या धनात्मक मूल्याच्या अगदी जवळ पोहोचतो आणि या उलट, जर फिबोनाची अनुक्रमातील पहिल्या संख्येला दुसऱ्या संख्येने भागले तर आपण ०.६१८ या गोल्डन रेश्योच्या सर्वांत लहान सकारात्मक मूल्याच्या अगदी जवळ पोहोचतो.

शेअर बाजाराच्या हालचालींवर हा गोल्डन रेश्यो लागू करताना, विश्लेषक टक्केवारी किंवा ६१.८ टक्के म्हणून व्यक्त केलेले ०.६१८चे सर्वात लहान सकारात्मक मूल्य वापरतात.

नंतर विश्लेषक अनुक्रमातील एका संख्येला उजवीकडील दोन जागा सोडून (तिसऱ्या) असलेल्या संख्येने विभाजित करतात. उदाहरणार्थ, जर फिबोनाची संख्याक्रम १, २, ३, ५, ८, १३, २१, ३४, ५५, ८९ १४४... असा पाहिल्यास २१/५५=०.३८=म्हणजेच त्याउलट ३८ टक्के गृहीत धरता येते. विश्लेषक नंतर अनुक्रमातील एका संख्येला उजवीकडील चौथ्या संख्येने विभाजित करतात. उदाहरणार्थ, २१/८९ = ०.२३६, म्हणजेच २३.६ टक्के . उदा. समजा ABC या शेअरचा भाव १०० रुपयांवरून वाढून २०० रुपयांवर गेला असल्यास त्याची ३८ टक्के रिट्रेसमेंट (प्रत्यागमन) सांगणारी पातळी १६२ असेल या भावपातळीवर असेल.

अनेक तांत्रिकी विश्लेषक शेअरच्या भावाच्या आधार आणि प्रतिकार यांचं विश्लेषण करण्यासाठी फिबोनाची टाइम झोन, रिट्रेसमेंट्स, आर्क्स आणि फॅन्स यांच्याद्वारे या गोल्डन रेश्योचा उपयोग करतात. आलेख तक्त्यावर हे आकडे आखताना विश्लेषक कोणत्याही ट्रेंडची न्यूनतम पातळी व त्या ट्रेंडची सर्वोच्च पातळी विचारात घेतली जाते. बाजारात उपलब्ध असलेली बहुसंख्य सॉफ्टवेअर्स या सर्व पातळ्या आलेख तक्त्यावर आपोआप आखून देतात ज्यांचा उपयोग आधार व प्रतिकार पातळी ठरवण्यासाठी करता येतो. या लागूकरणामागील सिद्धांत असा आहे की एकदा शेअरच्या भावात लक्षणीय वाढ किंवा घट झाली की, त्यानंतर त्याची प्रतिकार आणि आधार पातळी ही त्या सुवर्ण गुणोत्तरावर किंवा त्याजवळ असेल.



ही शृंखला सामान्यतः तांत्रिक विश्लेषकांद्वारे आलेख तक्त्यावर बाजारभावाच्या किमतीसाठी आधार व प्रतिकार पातळी शोधण्यासाठी वापरली जाते. शेअरच्या किमतीच्या टक्केवारीला रिट्रेसमेंट म्हणतात. बाजार विश्लेषणाची कोणतीही पद्धत १०० टक्के अचूक नसली तरी, रिट्रेसमेंट पद्धत पुरेशी विश्वासार्ह सिद्ध झाली आहे आणि ते एक मानक साधन बनले आहे.

फिबोनाची संख्या वापरून विश्लेषण करू इच्छित असलेल्यांनी शेअर अथवा निर्देशांकाचा आलेख पाहून त्यामध्ये एक विशिष्ट ट्रेंड पाहावा. उदाहरणार्थ, एखादा २०० वर व्यवहार करत असलेला शेअर १०० वरून सातत्याने वाढत असेल तर, जेव्हा त्या शेअरचा आलेख पहा आणि त्याला मंदीचे मूल्यांकन करण्यासाठी (ऑटोमॅटिक) फिबोनाची रिट्रेसमेंट लागू करा.

जेणेकरून त्याच्या आधारपातळ्या या अनुक्रमे २३.६ टक्के, ३८.२ टक्के, ५० टक्के व ६१.८ टक्के असू शकतील. माझे अनुमान व अनुभव आहे की मोठ्या तेजीसाठी ६१.८ पर्यंत रिट्रेसमेंट ग्राह्य धरता येते तर २३.६ टक्केपर्यंत करेक्शन होऊन शेअरची पुन्हा वरील वाटचाल ही चालू असलेला उर्ध्व कल मजबूत असल्याचे अनुमान सांगते. म्हणून खूप वाढ झालेल्या शेअरची पुनर्खरेदी करण्यासाठी हा अभ्यास खूप मोलाचा ठरतो. सोबतचा तक्ता आपण नमुन्या दाखल पाहुयात.

बँकनिफ्टी या लोकप्रिय निर्देशांकाचा खालील आठवडी आलेख पहा. हा निर्देशांक २७ मार्च २०२० च्या न्यूनतम पातळी (१६११६) पासून २९ ऑक्टोबर २०२२च्या आठवड्यात ४१८२९पर्यंत वाढलेला दिसतोय. आता यामध्ये पडत्या बाजारात खरेदी करण्यास पूरक आधार पातळ्या शोधण्यासाठी मी इथे (ऑटोमॅटिक प्लॉटेड) फिबोनाची रिट्रेसमेंट लावलीय. त्यानुसार पहिला आधार २३.६ टक्के करेक्शनवर म्हणजेच ३५७६१ वर होता आणि पातळी आसपास निर्देशांकानं नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यात व डिसेंबर पहिले तीन आठवडे तग धरलेली दिसून येईल (पिवळ्या रंगात केलेले लंबवर्तुळ). नंतर ती पातळी तोडल्यावर फिबोनाची प्रमाणे पुढील आधार होता ३८.२% रिट्रेसमेंट म्हणजे, ३२००७. आणि अगदी अचूकपणे या निर्देशांकानं ११ मार्च २०२२ व १७ व २४ जून अखेरीस संपणाऱ्या आठवड्यात आधार घेतलेला दिसून येतो (पिवळ्या रंगाचे बाण पहा).

अशाप्रकारे दिर्घमुदतीच्या खरेदीसाठी या फिबोनाची रिट्रेसमेंटचा उपयोग प्रत्येक शेअरची, निर्देशांकाची, कमॉडीटीसाठी, करन्सी आणि अगदी क्रिप्टोकरन्सीच्या आधार पातळ्या लक्षात घेण्यासाठी करता येऊ शकतो.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३५

### निकाल पुढीलप्रमाणे

१. येत्या ३० सप्टेंबर २२ पासून कोणत्या कंपनीचा निफ्टी ५० मध्ये समावेश होणार आहे?
ई. अदानी इंटरप्रायजेस

२. पुढीलपैकी कोणत्या देशाचा पहिल्या पाच अर्थव्यवस्थेमध्ये समावेश होत नाही?
इ. फ्रान्स

३. ऑगस्ट २२ मध्ये जीएसटीचे एकूण संकलन किती झाले आहे?
अ. १.४४ लाख कोटी रुपये

**अर्थसाक्षर स्पर्धा ३५या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३५साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३६

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. शेअर बाजारात गुंतवणूक करण्यासाठी आवश्यक असलेल्या डीमॅट खात्यांची संख्या भारतात सध्या एवढी झाली आहे?**
*अ.* ४.३ कोटी — *आ.* ५.५ कोटी
*इ.* १० कोटी — *ई.* ७.४ कोटी

**२. मोबाईल सेवा पुरविणारी भारतातील सर्वात मोठी कंपनी कोणती आहे?**
*अ.* जिओ — *आ.* भारती एअरटेल
*इ.* व्होडाफोन आयडिया — *ई.* टाटा टेलिकम्युनिकेशन

**३. भारतीय शेअर बाजारात सर्वाधिक बाजारमूल्य असलेली बँक कोणती?**
*अ.* एचडीएफसी बँक — *आ.* आयसीआयसीआय बँक
*इ.* कोटक महिंद्रा बँक — *ई.* स्टेट बँक ऑफ इंडिया

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

# माजी आमदाराच्या पुतण्याचा आत्महत्येचा प्रयत्न

## नातेवाईकांचा कंपनी व्यवस्थापनावर ठपका



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

बिस्किटाचे उत्पादन करणाऱ्या खालापूर तालुक्यातील नामांकित कंपनीतील इलेक्ट्रिक इंजिनियर प्रमोद लाड (वय ३१) यांनी कामावर असताना आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना शुक्रवारी (दि. ९) घडली असून, त्यांनी वरिष्ठांच्या जाचाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न करीत असल्याची चिठ्ठी लिहून ठेवली आहे. सदर चिठ्ठी समाज माध्यमांवर वायरल झाली आहे.

प्रमोद हे माजी आमदार सुरेश लाड यांचा पुतणे आहेत. त्यामुळेच या घटनेने सर्वत्र संताप व्यक्त होत आहे. दरम्यान, या प्रकरणी दोषी असणाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांकडून केली जात आहे.

खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीच्या हद्दीत खिरखिंडी येथे असलेल्या बिस्किट कंपनीत प्रमोद लाड गेल्या आठ वर्षापासून इलेक्ट्रिक इंजिनियर म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या वेतनात कोणतीही वाढ झालेली नाही. त्यांच्यापेक्षा कमी शिकलेल्या आणि आठ वर्षांपेक्षा कमी नोकरी झालेल्या कर्मचाऱ्यांना मात्र वेतनवाढ देण्यात आली आहे. आपल्यापेक्षा कमी अनुभव असलेल्यांना वेतनवाढ झाल्याने प्रमोद लाड यांनी आपले वेतन वाढवण्याची मागणी व्यवस्थापनाकडे लेखी पत्राद्वारे केली होती. मात्र वेतन करण्याऐवजी व्यवस्थापनाकडून प्रमोद लाड यांचा मानसिक छळ केला जात असल्याचे नातेवाईकांचे म्हणणे असून, व्यवस्थापनाकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळलेल्या प्रमोद यांनी निराशेतून आत्महत्या करण्याचा टोकाचा निर्णय घेतला. व्यवस्थापनाकडून होणारी पिळवणूक आणि मानसिक त्रासाबाबत चिठ्ठी लिहून ठेवत प्रमोद यांनी शुक्रवारी कंपनीत विषारी रसायन प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला. प्रमोद यांनी औषध प्राशन केल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांना खोपोलीतील पार्वती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. त्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना नवी मुंबईतील अपोलो रुग्णालयात हलविण्यात आले आहे. प्रमोद लाड हे माजी आमदार सुरेश लाड यांचे पुतणे आहेत. या घटनेची माहिती मिळताच कर्जतचे माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, राष्ट्रवादीचे खालापूर तालुका अध्यक्ष नरेश पाटील, सुरेश जाधव यांच्यासह अनेकांनी पार्वती रुग्णालयात धाव घेतली.

या प्रकरणी खालापूर पोलीस निरीक्षक बाळा कुंभारे यांच्याशी संपर्क साधला असता, या प्रकरणाची चौकशी करीत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रमोद यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती सुरेश लाड यांचे चिरंजीव अक्षय लाड यांनी दिली आहे. कंपनीचे एचआर कुलकर्णी यांनी, वाद झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. प्रमोद यांची समजूत घातल्याची माहिती देताना पोलिसांच्या मदतीने त्यांना समजावण्याचा प्रयत्न केल्याचे कुलकर्णी यांनी संगितले.

दरम्यान, प्रमोद यांनी टोकाचे पाऊल उचलल्याने त्यांचा मोठ्या प्रमाणात मानसिक छळ होत असावा, असा आरोप करीत प्रमोद यांच्या नातेवाइकांनी या प्रकरणात दोषी असणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे.

# रायगडातील जनावरांमध्ये लम्पी स्कीनचा प्रादुर्भाव नाही

## जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्तांची माहिती



**अलिबाग : प्रतिनिधी**

जनावरांमध्ये आढळणारया लम्पी स्कीन रोगाचा प्रादुर्भाव राज्यात मोठ्या प्रमाणावर झाला आहे. मात्र रायगड जिल्ह्यात अद्यापतरी जनावरांमध्ये या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला नाही, अशी माहिती रायगड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. आर. बी. काळे यांनी दिली. या वेळी जिल्हा परिषदेचे पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम, राजेश लाळगे उपस्थित होते.

जिल्ह्यात लम्पी स्कीनचा प्रादुर्भाव नसला तरी खबरदारी घेतली जात आहे. जिल्ह्यातील १२२ पशुवैद्यकीय संस्थांना याबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. जिल्ह्यात प्रतिबंधक १० हजार लसींचा साठा उपलब्ध करण्यात आला आहे. याखेरीज जनावरांचा बाजार, मेळावे, शर्यती यांवर बंदी घालण्यात आली आहे. याचे उल्लंघन केल्यास शिक्षा होवू शकते. १९६२ या क्रमांकावर हेल्पलाईन सुरू करण्यात आली असून त्यावरून पशुपालकांना मार्गदर्शन करण्यात येत आहे, असे डॉ. काळे यांनी सांगितले.

### लम्पी स्कीनची लक्षणे

**लम्पी स्कीन हा विषाणू शेळीवर्गीय प्राण्यांमध्ये आढळणाऱ्या लम्पी पॉक्स या विषाणूचा नवीन व्हेरीयन्ट आहे. त्याचा प्रादुर्भाव प्रामुख्याने गाय व म्हैसवर्गीय प्राण्यांमध्ये होतो. ताप येणे, नाकातोंडात, डोळ्यात अल्सर, भूक मंदावणे, वजन कमी होणे, दुधात घट होणे, अंगावर गाठी येणे, पायाला सूज येणे ही या आजाराची लक्षणे आहेत. लम्पी स्कीनचा प्रादुर्भाव माणसात होत नाही. माशा, कीटक, गोचिड यातून हा आजार पसरतो.**

### पशुवैद्यक अधिकाऱ्यांचा तुटवडा

**रायगड जिल्ह्यात सुमारे दोन लाख ३९ हजार इतके गाय व म्हैसवर्गीय पशू आहेत. त्या तुलनेत पशुवैद्यक अधिकाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे. जिल्हा परिषदेच्या श्रेणी १ च्या दवाखान्यांमध्ये ५४ पदे मंजूर असून त्यातील १९ पदे रिक्त आहेत. तर श्रेणी २ च्या दवाखान्यांमध्ये ७९ मंजूर पदापैकी ४३ रिक्त आहेत. त्यामुळे एकेका अधिकाऱ्याकडे दोन ते तीन दवाखान्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. परिणामी लसीकरण, उपचार, तपासणी या कामात अडथळे येत आहेत. ही बाब लक्षात घेवून अधिकाऱ्यांना प्रत्येक दवाखान्यासाठी वार ठरवून देण्याबरोबरच हालचाल रजिस्टर ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्याची माहिती जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. शामराव कदम यांनी या वेळी दिली.**

**“ मुरुड तालुक्यातील कोर्लई व बोर्ली येथे पाच जनावरे संशयास्पद आढळून आली होती. त्यांच्यावर योग्य उपचार विलगीकरण करण्यात आले. ही जनावरे पूर्णपणे बरी झाली आहेत. भोपाळ येथील प्रयोगशाळेकडून आलेल्या अहवालानुसार या जनावरांना लम्पी स्कीनची बाधा झाली नसल्याचे स्पष्ट झाले आहे. असे असले तरी पशुसंवर्धन विभाग सतर्क झाला आहे. शीघ्र कृतीदल तयार करण्यात आले आहे.**

**–डॉ. आर. बी. काळे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, रायगड**

# स्व. संतोष पवार यांना माथेरानमध्ये अभिवादन

**कर्जत : बातमीदार**

पत्रकार संघटनेत विविध पदांवर काम करणारे माथेरान येथील दिवंगत पत्रकार संतोष पवार यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले.

माथेरानमध्ये प्रेस क्लबच्या माध्यमातून स्व. संतोष पवार चौक उभारण्यात आला आहे. पंचवटी नगर येथील चौकात असलेल्या स्तंभाला संतोष पवार यांच्या द्वितीय स्मृतिदिनी अभिवादन करण्यात आले. माथेरान प्रेस क्लबचे दिनेश सुतार यांनी प्रास्ताविक केले. प्रसाद सावंत, योगेश जाधव आणि संतोष पेरणे यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

स्व.संतोष पवार यांचे सुपुत्र मल्हार पवार, माथेरान नागरी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष हेमंत पवार, माजी नगरसेवक प्रकाश सुतार, तसेच सचिन दाभेकर, राकेश कोकळे, शैलेश चाफेरकर, आप्पा पेमारे, नितीन शेळके यांच्यासह पवार कुटुंबीय आणि पत्रकार उपस्थित होते. चद्रकांत काळे यांनी आभार मानले.



# नागोठण्यात अल्पवयीन मुलीचे अपहरण

**नागोठणे : प्रतिनिधी**

चिकणी आदिवासीवाडीतील एका अल्पवयीन (वय १६) मुलीचे अपहरण झाले असून, याबाबत तिचे वडील बाळू शिवराम वाघमारे (वय ३६) यांनी नागोठणे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



आपली मुलगी मुलगी अल्पवयीन असल्याचे माहीत असूनदेखील संशयित इसम नागेश नाईक (वय २०, रा. वळवली ता. अलिबाग) याने तिला फूस लावून पळवून नेले, असे बाळू शिवराम वाघमारे यांनी तक्रारीत म्हटले आहे. या बाबत नागोठणे पोलीस ठाण्यात भादवि कलम ३६३ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून, अधिक तपास सुरू आहे.

## धाटाव औद्योगिक वसाहतीत चोरी

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव औद्योगिक वसाहतीत पोलीस ठाण्यालगत असलेल्या सीइटीपी केंद्रातील सुमारे एक लाख आठ हजार रुपये किमतीचे आठ पाईप अज्ञात इसमाने चोरून नेले.

धाटाव औद्योगिक वसाहतीच्या सीइटीपीमधील टाकीच्या कामासाठी आणलेले ४८ मीटर लांबीचे प्रत्येकी २२६२ रुपये किमतीच आठ पाईप मोकळ्या जागेतून अज्ञात इसमाने लंपास केले. याबाबत प्रसाद दीपक राईज (वय २३, रा. वरसे, ता. रोहा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# माणगावात फुलली भाताची शिवारे!

## तालुक्यातील २०६ गावांमधील सुमारे १२५८९ हेक्टरवरील भातपीक पोटऱ्यात

**माणगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील २०६ गावामधील शेतकऱ्यांनी या वर्षी ११२८१ हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड केली आहे. पोषक पाऊस पडल्याने भाताचे पीक पोटऱ्यात आले असून ते फुलले आहे. त्यामुळे माणगाव तालुक्यातील शेतकरी आनंदात आहेत.

माणगाव तालुक्यात सुरवातीच्या काळात पावसाने दडी मारल्याने बियाणे वेळेवर रुजले नाही. त्यानंतर या रोपांना अतिवृष्टीचा फटका बसला होता. त्यामुळे ८८ टक्के भात लावणी उशिरा करण्यात आली होती. सुरवातीला झालेल्या भात लावणीचे पीक आता काही ठिकाणी पोटऱ्यात आले आहे.

माणगाव तालुक्यात गेल्या वर्षी भात पिकाचे सरासरी क्षेत्र १२५८९ हेक्टर होते. यंदा शेतकऱ्यांनी ११२८१ हेक्टर क्षेत्रावर भात पेरणी केली आहे. त्यामुळे खरीप हंगामात ३२९३ मेट्रिक टन उत्पादन घटणार आहे. नाचणी पिकाचे क्षेत्र गेल्या वर्षी सुमारे १०९९ हेक्टर होते. चालू वर्षी ७२२ हेक्टरवर नाचणी पिकाची पेरणी केली आहे. त्यानुसार नाचणी पिकाचे ३७७ हेक्टर क्षेत्र कमी झाले असून यंदा नाचणीचे ५८८ मेट्रिक टन उत्पादन कमी होणार आहे.




भात पिकावर खोडकिडीचा प्रादूर्भाव दिसून येण्याची शक्यता असून त्यामुळे रोपाचा मधला भाग वरून खाली सुकत येतो. यालाच गाभामर असे म्हणतात. लावणीनंतर शेतात पाच टक्के कीडग्रस्त फुटवे आढळून आल्यास किंवा एक चौरस मीटर क्षेत्रात किडीचा एक अंडीपुंज आढळून आल्यास उपाययोजना कराव्यात. कॉर्स्टॅप हायड्रोक्लोराइड चार टक्के दाणेदार १८८ ग्रॅम प्रति गुंठा किंवा क्लोरॅनट्रीनीलीपोल ०.४ टक्के दाणेदार १०० ग्रॅम किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार २०८ ग्रॅम प्रतिगुंठा या प्रमाणात दाणेदार कीटकनाशक जमिनीत पुरेसा ओलावा असताना द्यावे. पाणथळ भागांमध्ये पाण्याचा निचरा करून बांध बांधून घेऊन दाणेदार कीटकनाशकांचा वापर करावा. खोडकिडीच्या नियंत्रणासाठी शेतामध्ये २० ते २५ मीटर अंतरावर एक असे आठ कामगंध सापळे प्रति एकरी लावावेत. फुटवे अवस्थेत देण्यात येणाऱ्या नत्र खताच्या मात्रे सोबत दाणेदार कीटकनाशक द्यावे.

जिल्ह्यातील बहुतांश ठिकाणी पावसाने उघडीप दिली आहे. त्यामुळे तापमानामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते. या वातावरणातील बदलामुळे काही ठिकाणी पिवळा खोडकिडा, सुरळीतील अळी व निळे भुंगिरे यांचा प्रादूर्भाव दिसण्यास सुरुवात झाली आहे. अशा परिस्थितीत शेतकरी बांधवांनी जागरुक राहून भात शेतीचे नियमित सर्वेक्षण करावे व प्रादूर्भाव आढळून आल्यास व्यवस्थापनासाठी खालीलप्रमाणे कीडनिहाय उपाययोजना कराव्यात, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

# फणसाड अभयारण्यात गिधाड आहार केंद्र

## ग्रीन वर्क ट्रस्टच्या सहकार्याने अनोखा उपक्रम



**मुरुड : प्रतिनिधी**

गिधाडांचे संवर्धन व त्यांची संख्या वाढण्यासाठी ग्रीन वर्क ट्रस्ट व फणसाड अभयारण्य यांच्या संयक्त विद्यमाने या अभयारण्यात गिधाडांच्या आहार केंद्राची संकल्पना कार्यान्वित करण्यात आली आहे.

गिधाडे ही ताकदवान असतात. दिवसा आकाशात उंचावरून घिरट्या मारून ते आपले भक्ष्य शोधत असतात. सध्या गिधाडांची संख्या कमालीच्या घटली आहे. फणसाड अभयारण्यात सन २०१५ पर्यंत गिधाडांची संख्या ३० ते ३५ च्या घरात होती. परंतु त्यानंतर अन्नाअभावी त्यांनी फणसाड क्षेत्रातून स्थलांतर केले. गेलेली गिधाडे पुन्हा फणसाडमध्ये यावीत व त्यांचा अधिवास वाढवा, यासाठी ग्रीन ट्रस्ट वर्क व फणसाड यांच्या संयुक्त विद्यमाने या अभयारण्यात गिधाड आहार केंद्र करण्यात आली आहेत. त्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला लेखी पत्र देण्यात आले असून, मृत जनावरांची खबर तातडीने ग्रीन ट्रस्ट वर्क यांना द्यावयाची विनंती करण्यात आली आहे. हे मृत जनावर फणसाड अभयारण्याच्या मध्यभागी गिधाडांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी ग्रीन ट्रस्ट वर्कचे सर्व सदस्य फणसाड परिसरात वास्तव्य करून आहेत. कोणाचाही फोन येताच ते सदस्य हे मृत जनावर ताब्यात घेण्यासाठी जाणार आहेत. अत्यंत नियोजनबद्धरित्या हे काम सुरु झाले असून, गिधाडांची संख्या वाढवण्याचे प्रामाणिक प्रयत्न सुरु झाले आहेत.



**“ गिधाडांना वाचवण्यासाठी व त्यांची संख्या वृद्धिंगत करण्यासाठी प्रोटेक्ट जटायू ही संकल्पना अमलात आणली आहे. त्यासाठी ग्रीन ट्रस्ट वर्कचे मोठे सहकार्य लाभत आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला लेखी पत्र पाठवण्यात आले असून मृत जनावराविषयीची माहिती तात्काळ कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. लोकांनी आम्हाला चांगले सहकार्य केल्यास ही संकल्पना रुजवण्यात यश येईल.**

**–तुषार काळभोर, वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड अभयारण्य, ता. मुरुड**

# चारित्र्याच्या संशयावरून पेणमध्ये पत्नीची हत्या

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील चांदेपट्टी येथे संजय दळवी याने रागाच्या भरात आपल्या पत्नीच्या डोक्यात सिलेंडर मारून हत्या केल्याची घटना घडली आहे.

ठाणे येथे राहणारा संजय तुकाराम दळवी हा पत्नी सुवर्णा दळवी, तीन मुले व आईसह गणेशोत्सवानिमित्त आपल्या गावी चांदेपट्टी येथे आला होता. दुपारच्या सुमारास नवरा बायकोचे भांडण झाल्याने दळवी याने रागाच्या भरात पत्नीच्या डोक्यात सिलेंडर घालून तिला ठार केले. तो नेहमी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असे. त्यामुळे त्या दोघांच्यात वारंवार भांडणे होत असत. रागाच्या भरात त्याने पत्नीच्या डोक्यात सिलेंडर घातला. त्यात त्याची पत्नी जागीच ठार झाली. या घटनेची माहिती मिळताच कल्पेश ठाकूर यांनी रुग्णवाहिकेसह सहकारी महेश भिकवले यांना घेऊन घटनास्थळी झाले. त्यानंतर पोलिसांच्या मदतीने सुवर्णा दळवी यांचा मृतदेह रुग्णालयात आणण्यात आला. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.


**PUBLIC NOTICE**

**Gurdwara Sri Guru Singh Sabha (Regd.) Kharghar**

Regd. No. F-4759 (Raigad)

Plot No.8, Sector 22, Kharghar, Navi Mumbai 410 210

**MEMBERSHIP DRIVE**

This is to inform entire Sangat of Kharghar that a Membership Drive is being conducted to enrol as New Life Member or Annual Member in Kharghar Gurdwara. The application form can be collected and submitted back in the office of Gurdwara from **10.09.2022 to 15.09.2022** between 11:00 am & 5:00 pm. Annual Membership renewal will also be done on these days.

**For Managing Committee**
**Jagir Singh**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**TENDER EXTENSION NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-8/22-23 (RFX No. 7000024415) | | | Period for submission of E-Bid: 09.09.2022 to 16.09.2022 up to 23:59hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| Name of Work: Replacement of existing damaged 400kV 0.5 ACSR Quadruple Bus conductor Span at 400kV RS, Kharghar | | | | | |
| Estimated Cost | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical Opening Date | Commercial Opening Date |
| Rs.12,28,879.44/- (Including GST) | Rs. 12,288.79/- | Rs.500/- + GST | **16.09.2022** up to 23:59 hrs | **17.09.2022** at 10:00 hrs (If possible) | **17.09.2022** at 10:15 hrs (If possible) |
| **Contact Persons:** 1) Mr. S.O.Katkar, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 7666127972 2) Ms. P.C.Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988 For further details visit our website **www.mahatransco.in** | | | | | |

1] Tender document can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in.**

SD/-
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

# मोरबे धरण ८० टक्क्यांहून अधिक भरले

## दमदार पावसामुळे महिनाभरात १५ टक्क्यांनी पाणीसाठा वाढला



**नवी मुंबई : बातमीदार**

मागील दोन दिवसांपासून नवी मुंबई शहराला पावसाने झोडपून काढले आहे, त्यामुळे मोरबे धरण क्षेत्रात पाण्याची पातळी वाढली आहे. नवी मुंबई शहरात गुरुवारी सरासरी ८९.७९ मिमी पाऊस पडला आहे, तर मोरबे धरण परिसरात केवळ ८.९ मिमी पावसाची नोंद आहे. म्हणजे धरण ८० टक्क्यांहून अधिक भरले आहे. पुढील काळात पाणलोट क्षेत्रात चांगला पाऊस पडल्यास उर्वरित धरणही भरेल.

नवी मुंबई महापालिकेकडून नवी मुंबई शहर आणि सिडकोच्या कळंबोली कामोठे या भागात मोरबे धरणातून पाणी पुरवठा केला जातो. दिवसेंदिवस नवी मुंबई शहरात नागरी वस्ती वाढत आहे. त्यामुळे पाण्याची मागणी वाढत आहे. एकीकडे मोरबे धरणात पाणीसाठा वाढत आहे मात्र दुसरीकडे पाण्याचा होणारा पुरवठादेखील वाढत आहे. कालांतराने नवी मुंबई शहराला मोरबे धरण पाणी पुरवठा ही कमी पडण्याची शक्यता असल्याने इतर धरणाचा पाणी पुरवठा करण्यासाठी महापालिकेचे नियोजन सुरू आहे. सन २०१९मध्ये आणि त्याआधी सलग तीन वर्षे ऑगस्टमध्येच धरण ओव्हरफ्लो झाले होते. मागील दोन वर्षांपासून धरण क्षेत्रात कमी पाऊस पडत असल्याने १०० टक्के धरण भरण्यास विलंब होत आहे. गुरुवारी नवी मुंबई शहरात पावसाने दमदार हजेरी लावली त्यामुळे धरण परिसरात आतापर्यंत २८६५.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी आणखीन ३८००मिमी पावसाची आवश्यकता आहे. सध्या धरणात ८५.२४ मीटर पाण्याची पातळी असून धरण भरण्यासाठी तीन मीटर पातळीची गरज आहे. मागील वर्षी सप्टेंबरअखेर धरण पूर्ण भरले होते.

मागील तीन दिवसांपासून पावसाचा जोर पुन्हा वाढला आहे. त्यामुळे धरण शंभर टक्के भरेल, असा विश्वास मोरबे प्रकल्प कार्यकारी अभियंता वसंत पडघन यांनी व्यक्त केला आहे.

# नवी मुंबईत २१४ सार्वजनिक, ८३५५ घरगुती गणेशमूर्तींचे विसर्जन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरात अनंत चतुर्थीला गणरायांचे विसर्जन मोठ्या उत्साहात करण्यात आले. महापालिकेच्या वतीने श्रीगणेशमूर्ती विसर्जन सोहळा सुव्यवस्थित रितीने झाला.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रातील सर्वच विसर्जन तलावावर पालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या नियंत्रणाखाली व नवी मुंबई पोलीस आयुक्त यांच्या मार्गदर्शनखाली श्रीगणेशमूर्ती विसर्जन सुयोग्य रितीने झाले. नवी मुंबई महापालिकेने विसर्जनासाठी २२ नैसर्गिक व १३४ कृत्रिम अशा १५६ विसर्जन स्थळांवर विसर्जनासाठी चोख व्यवस्था केली होती.

२१४ सार्वजनिक व ८३५५ श्रीगणरायाच्या मूर्तींचे विसर्जन सुव्यवस्थित रितीने पार पडल्याची माहिती पोलीस विभागाने दिली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आठही विभाग कार्यालय क्षेत्रात मोठ्या संख्येने कृत्रिम तलावांची निर्मिती करण्यात आली होती.

नागरिकांनी जलप्रदूषण रोखण्यासाठी या कृत्रिम विसर्जन तलावांवर विसर्जन करून पर्यावरणशीलता जपावी या पालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देत १३४ कृत्रिम तसेच नैसर्गिक तलावात गणरायाचे विसर्जन करण्यात आले. अखेरच्या दिवशी विसर्जनाच्या वेळी ८५३३ घरगुती व २४१सार्वजनिक श्रीगणेशमूर्तींना भक्तांनी भावपूर्ण वातावरणात निरोप दिला. तर विसर्जनाचा सोहळा उशीरापर्यंत सुरू होता.

परिमंडळ १ व २ चे उपआयुक्त यांच्या नियंत्रणाखाली संबंधित विभाग अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त तसेच विभाग कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवक, लाईफगार्डस व अग्निशमन दल दक्षतेने कार्यरत असल्याचे चित्र होते. श्रीमूर्तींच्या व गौरींच्या विसर्जनासाठी तराफ्यांची तसेच आवश्यक त्या ठिकाणी क्रेनची व्यवस्था केली होती. पुरेशा विद्युत व्यवस्थेसह जनरेटरची पर्यायी व्यवस्था करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सुरक्षेची काळजी घेण्यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा सज्ञ होती.

२२ मुख्य विसर्जन स्थळे व १३४ कृत्रिम तलाव अशा ओल्या व सुक्या निर्माल्यासाठी दोन स्वतंत्र निर्माल्य कलश ठेवण्यात आले होते. त्याची वाहतुक निर्माल्याचे पावित्र्य राखण्याची काळजी घेत स्वतंत्र निर्माल्य वाहनाव्दारे तुर्भे येथील प्रकल्पस्थळी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली.

विसर्जनाच्या आजच्या दिवशी नवी मुंबईत कोरोनानंतर प्रथमच भर पावसात पुन्हा एकदा उत्सवाचा व उत्साहाचा जोश सर्वत्र पाहायला मिळाला, तर सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणा सज्ञ होती. तसेच कोणत्याही प्रकारची वाहतूककोंडी होऊ नये यासाठी वाहतूक पोलीसही अत्यंत सजगतेने वाहतूक व्यवस्थेचे व्यवस्थापन करत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# पनवेल महापालिका हद्दीत अतिक्रमणविरोधी कारवाई

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील प्रभाग 'ड' आणि 'अ' मध्ये अनधिकृत फेरीवाले व अतिक्रमणाविरुद्ध आयुक्त गणेश देशमुख यांच्या आदेशानूसार कारवाई करण्यात आली.

प्रभाग 'ड' मधील पनवेल रेल्वेस्थानकाच्या बाहेर तसेच नवीन पनवेल बाजूच्या फूटपाथवर बसणाऱ्या अनधिकृत फेरीवाल्यांवरती महापालिकेने कारवाई केली. या फेरीवाल्यांमुळे फूटपाथवरून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांची गैरसोय होत होती. या वेळी जेसीबीच्या साहाय्याने अनधिकृतरित्या उभारलेल्या शेड तोडण्यात आल्या तसेच फेरीवाल्यांचे सामान जप्त करण्यात आले. याचबरोबर काळुंद्रे आणि भिंगारी येथील रोडवरील अनधिकृत व्यावसायिकांवर कारवाई करण्यात आली.

प्रभाग 'अ' खारघरमध्ये रस्त्याच्या कडेला काही फेरीवाल्यांनी अनधिकृतरित्या पक्के शेड उभारले होते. या अनधिकृत उभारलेल्या दुकानांवर व शेडवरती ही महापालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली. जेसीबीच्या सहाय्याने इथे उभारलेली अनधिकृत दुकाने व शेड जमीनदोस्त करण्यात आली.



# मोहोपाडा परिसरात गणरायाला भक्तिभावाने निरोप

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या... अशा एक ना अनेक आरोळ्या देत रसायनी व आसपासच्या परिसरातील अनंतचतुर्दशीच्या गणपतींचे भक्तिभावाने विसर्जन करण्यात आले.

परिसरातील पाताळगंगा नदी, मोहोपाडा तलाव, रिस पुल, कांबे गणेश घाट, वावेघर गणेश घाट आदी ठिकाणी भजने गावून वाजत-गाजत, गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या च्या आरोळ्या देत विसर्जन करण्यात आले.



या वेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक कैलास डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली विसर्जनस्थळी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

बाप्पांना निरोप देताना लहान मुलांसह कुटूंबातील सदस्य भावूक झाल्याचे दिसून आले. पावसाने उघडीप दिल्याने विसर्जन सोहळ्यात कोणताही विघ्न आला नाही, मात्र लाडक्या एकदंताला निरोप देताना भाविकांचा कंठ दाटून आल्याचे चित्र विसर्जन स्थळी पहावयास मिळाले. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या... च्या जयघोषात पुष्पवृष्टी करत गणरायाला भक्तांनी निरोप दिला. या वेळी काहींनी पायी चालत तर काहींनी हातगाड्यांवर तर काहींनी आपल्या खासगी वाहनांमधून गणरायांना विसर्जन घाटात आणत असल्याचे चित्र दिसुन आले.



मोहोपाडा : ग्रुप ग्रामपंचायत माजगावचे सरपंच गोपीनाथ जाधव यांच्या निवासस्थानी विराजमान गणपतीचे आमदार महेश बालदी यांनी दर्शन घेतले. या वेळी तुकाराम जाधव, जनार्दन जाधव, जयेश पाटील, आत्माराम जाधव, रमेश वाळकु जाधव, रमाकांत जाधव, गजानन्न जाधव, विलास कांबळे, जयवंत पाटील, शिवाजी शिंदे, किरण शिंदे, सागर शिंदे, विनायक शिंदे, राहुल शिंदे आदी उपस्थित होते.



उरण : तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलचे प्राचार्य अरुण शंकर घाग यांच्या घरातील विराजमान गणरायाचे विसर्जनापूर्वी भारतीय मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील, रयत सेवक संघाचे महाराष्ट्राचे समन्वयक नुरा शेख यांनी दर्शन घेतले. या वेळी घाग कुटुंबीय उपस्थित होते.



पनवेल : देवद येथील पाटील कुटुंबीयांच्या निवासस्थानी अनंत चतुदर्शीपर्यंत प्रतिष्ठापना करण्यात आलेल्या श्री गणरायाचे येथील नदीपात्रात विसर्जन करण्यात आले.





पनवेल : कान्हाशेठ ठाकूर यांच्या न्हावेखाडी निवासस्थानी दहा दिवस विराजमान झालेल्या बाप्पाचे माजी नगरसेविका दर्शना भोईर, तालुका सरचिटणीस लीना पाटील, महिला मंडळ अध्यक्ष देवकुबाई कान्हाशेठ ठाकूर, माजी नगरसेविका कल्पना अरुणशेठ ठाकूर, तुळसाबाई घरत, निल सागर ठाकूर, माऊली ठाकूर, रोहीणी ठाकूर, सपना स्वप्नील ठाकूर, रुचिता रोशन ठाकूर, सुगंधा अल्केश बैकर, ज्योती सागर ठाकूर, साधना ठाकूर, स्मित स्वप्नील ठाकूर यांनी दर्शन घेतले.





पनवेल : वाकडी येथील सुरज पाटील यांच्या गणरायाचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. तत्पूर्वी कुटुंबीयांनी बाप्पाचे दर्शन घेतले.



पनवेल : माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर यांच्या निवासस्थानी अनंत चतुर्दशीनिमित्त विराजमान गणरायाचे भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, लीना पाटील, प्रणाली घरत, ॲड. शुभांगी बहिरा, माधुरी गोसावी यांनी दर्शन घेतले. या वेळी पिंकी कल्याणकर, स्नेहल कल्याणकर, सोनाली कल्याणकर आदी उपस्थित होते. दरम्यान, श्री सत्यनारायणाची महापूजाही आयोजित करण्यात आली होती.



नवी मुंबई : येथील रहिवासी असलेले प्रसिद्ध संगीतकार, गीतकार, गायक, दिग्दर्शक पद्मश्री शंकर महादेवन यांच्या घरगुती गणरायाचे आमदार मंदा म्हात्रे यांनी दर्शन घेतले.



कामोठे : सेक्टर २२ येथील शिव सह्याद्री मित्र मंडळाच्या गणरायाचे विसर्जनापूर्वी भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, लिना पाटील, सपना पाटील यांनी दर्शन घेतले. या वेळी मंडळाच्या पदाधिकारी स्वाती केंद्रे उपस्थित होत्या.

# रायगड जिल्ह्यात गणरायाला भावपूर्ण निरोप

**अलिबाग : प्रतिनिधी**

दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर अनंत चतुर्दशीच्या दिवशी (दि. ९) गणेशभक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या असे आवाहन करून आपल्या लाडक्या गणरायाला निरोप दिला. जिल्ह्यातील १६४ सार्वजनिक व १७ हजार ४५९ खासगी असे एकूण १७ हजार ६२३ गणपतींचे विसर्जन करण्यात आले. समुद्र किनारे, नदी, तलाव अशा विसर्जन घाटांवर भाविकांची मोठी गर्दी पहायला मिळाली. विसर्जन मिरवणुकांवर पोलिसांची करडी नजर होती.



पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी अलिबागसह अन्य ठिकाणी निर्माल्य संकलन व्यवस्था करण्यात आली होती. जिल्हा प्रशासनाबरोबरच पोलीस यंत्रणा, विविध स्वयंसेवी संस्था विसर्जन सुरळीत पार पाडण्यासाठी सज्ज होते. पोलीस बंदोबस्तात कुठेही त्रुटी राहू नये, याची दक्षताही रायगड पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी घेतली होती.

पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांबरोबरच एसआरपीएफ, आरसीपी, स्ट्रायकींग फोर्स, होमगार्ड आदी सुरक्षा यंत्रणेमार्फत बंदोबस्त तैनात करण्यात आले होता. कोरोनामुळे मागील दोन वर्षे गणेशोत्सव साजरा करताना अनेक निर्बंधांचे पालन करावे लागत होते. त्यामुळे गणेशभक्तांमध्ये निरूत्साहाचे वातावरण होते.

मात्र यंदा कोरोनामुक्त वातावरण आणि निर्बंधमुक्त उत्सव यामुळे गणेश भक्तांचा आनंद ओसंडून वाहात होता. विसर्जन स्थळापर्यंत जाण्यासाठी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी रायगड पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली ठिकठिकाणी योग्य तो पोलीस बंदोबस्त लावून तयारी करण्यात आली होती. याशिवाय विसर्जन मिरवणुकींच्या मार्गावरील वाहतूक व्यवस्थेत बदल करण्यात आले होते.

अलिबाग समुद्र किनारी विसर्जन सोहळा सुरळीत पार पाडण्यासाठी अलिबाग नगरपालिकेतर्फे कर्मचाऱ्यांचा ताफा तैनात होता. समुद्र किनारी स्वागत कक्ष उभारण्यात होता. जीवरक्षक, मोटरबोटींची सोय, अग्नीशमन यंत्रणा, याबरोबरच रुग्णवाहिकाही सज्ज होत्या.

**रोहे, कोलाड : प्रतिनिधी**

शहरासह रोहा तालुक्यातील ग्रामीण भागात शुक्रवारी दहा दिवसांच्या गणरायांना जड अंतःकरणाने निरोप देण्यात आला. गणरायाच्या विसर्जनासाठी खुद्द वरुणराजाने हजेरी लावली होती. गणपती चालले गावाला चैन पडेना आम्हाला, गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी साद घालीत भाविक, भक्तांनी गणरायाला निरोप दिला. रोहा पोलीस ठाणे हद्दीतील पाच सार्वजनिक व ९९४ खाजगी तर कोलाड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दहा सार्वजनिक आणि ३८ खाजगी गणपतींचे रात्री उशीरापर्यंत विसर्जन करण्यात आले.



रोहा तालुक्यातील मेढा, कोलाड, खांब, चणेरा, पिंगळसई, देवकान्हे, घोसाळे, यशवंतखार आदी विभागात गणेश विसर्जन शांततेत पार पडले. रोहा अष्टमी शहरात शुक्रवारी दुपारपासूनच गणरायाच्या विसर्जनाची लगबग सुरू झाली होती. सायंकाळी पाच वाजल्यापासून पारंपरिक खालूबाजा, ढोल, ताशा पाश्चिमात्य वाद्यवृंद यांच्या तालावर गणपती विसर्जनाच्या मिरवणुकांना सुरुवात झाली. त्यात अबालवृध्द ठेका घेताना दिसत होते.

गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी, गणरायाचे जयघोष करीत गणेशभक्त या विसर्जन मिरवणुकांत सहभागी झाले होते.

रोहा शहरातील कुंडलिका नदीच्या तीरावरील बंदर पकटी, कुंडलिका नदी संवर्धन, दमखाडी तर अष्टमी पकटी येथे गणरायाला डोक्यावर, हातगाडी, रिक्षा, चारचाकी वाहनांतून भविक येत होते. विसर्जन घाटावर आरती घेतल्यानंतर कुंडलिका नदीत बाप्पांचे विसर्जन करण्यात येत होते.

नगर परिषदेचे प्रशासक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा अष्टमी शहरातील गणपती विसर्जन घाटांवर स्वच्छता, वीजेची व्यवस्था करण्यात आली होती. निर्माल्यासाठी कलश ठेवण्यात आले होते.

विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांचे नगर परिषदेच्या वतीने स्वागत करण्यात येत होते. पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. किरणकुमार सुर्यवंशी, निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली रोहा येथे तर सहाय्यक निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली कोलाड येथे चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

कर्जत तालुक्यात शुक्रवारी (दि. ९) अनंत चतुर्दशीच्या एकूण ११२१ गणरायाना भावपूर्ण निरोप देण्यात आला. भाविकांनी नदी तसेच गावाजवळ असलेल्या तलाव व ओढ्यांमध्ये गणरायाचे विसर्जन केले.



तालुक्यातील कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नऊ सार्वजनिक, ४२४ खाजगी, नेरळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ६६३ खाजगी आणि माथेरान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील २५ खाजगी अशा एकूण ११२१ गणेशमूर्तींचे 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या गजरात शुक्रवारी विसर्जन करण्यात आले. काही विभागातील गणेशमूर्ती एकाच वेळी वाहनांतून उल्हास नदीच्या घाटावर आणून त्यांचे विसर्जन केले. दहिवली, मुद्रे बुद्रुक, मुद्रे खुर्द, आकुर्ले गावातील भाविकांनी आपापल्या गणेश घाटाकर जाऊन गणरायांचे भावपूर्ण वातावरणात विसर्जन केले. गुंडगे आणि भिसेगाव येथील भाविकांनी कर्जतमधील गणेश घाटावर येऊन आपल्या गणेशमूर्तींचे विसर्जन केले. कर्जत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचे विसर्जन वेगळ्या पद्धतीने केले जाते. लोकमान्य टिळक चौकात अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला, स्वातंत्र्य सैनिक दत्तात्रेय डोंबे विद्या निकेतन, विद्या विकास मंदिर, जनता विद्या मंदिर, शिशु मंदिर या शाळांमधील विद्यार्थ्यांनी लेझीम, कवायत सादर केली. सूत्रसंचालन राजाभाऊ कोठारी यांनी केले. मंडळाचे सचिव मंगेश जोशी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून विसर्जन मिरवणुकीचा प्रारंभ करण्यात आला.

ही मिरवणूक महावीर पेठ, जकातनाका, मुख्य बाजारपेठ, कपालेश्वर मंदिर मार्गे गणेश घाटावर नेऊन गणरायाचे भावपूर्ण विसर्जन करण्यात आले. मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, अभिजीत मराठे, सदानंद जोशी, निलेश परदेशी, पंकज शहा, रामराव पाटील, गणेश ठोसर, अमित मराठे, बंटी लोवंसी, संदीप भोईर, रोनक कोठारी आदींसह शिक्षक, विद्यार्थी तसेच अनिरुद्ध उपासना ट्रस्टचे कार्यकर्ते या विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले होते.

या वेळी पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

**पाली : प्रतिनिधी**

दहा दिवसांच्या पाहुणचारानंतर सुधागड तालुक्यातील पाली, जांभुळपाडा, परळी, पेडली आदीसह अनेक गावे, वाड्या, वस्त्यामधील गणरायांना शुक्रवारी साश्रु नयनांनी निरोप देण्यात आला. या वेळी ढोल ताशे, बेंजो पथकासह वाजत गाजत बाप्पांच्या मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. या वेळी लहान-थोरांसह महिलांनी वाद्यवृदांच्या तालावर ठेका धरला होता.



विसर्जन मिरवणुकीत गुलालाची उधळण व फटक्यांची आतिषबाजीदेखील करण्यात आली. पाली-खोपोली राज्यमहामार्गासह पालीत सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या अनुषंगाने वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले होते. शांतता व सुरक्षेच्या दृष्टीने पाली पोलीस निरिक्षक विश्वजीत काइंगडे यांनी चोख व कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला होता. विसर्जनस्थळी प्रशानामार्फत स्वच्छता व वीज व्यवस्थेबरोबरच अन्य सेवा-सुविधा पुरविण्यात आल्या होत्या. विसर्जनस्थळी जीवरक्षकांसह पोलीस तैनात करण्यात आल्याने गणेशभक्तांना पूजन करुन बाप्पांचे विसर्जन करता आले.



**माणगाव : प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या, च्या गजरात माणगावात शुक्रवारी दहा दिवसांच्या गणपतींना भावपूर्ण निरोप देण्यात आला. काळ नदी पात्रात गणरायांचे विसर्जन करण्यात आले.

माणगाव नगरपंचायतीतर्फे विसर्जनाची व्यवस्थाची व्यवस्था करण्यात आली होती. शुक्रवार दुपारपासूनच विविध सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी व गणेश भक्तांनी आपले दहा दिवसांचे गणपती विसर्जनासाठी बाहेर काढले होते. नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, उपनगराध्यक्ष सचिन बोंबले व सर्व नगरसेवकांनी गणेश भक्तांचे स्वागत केले. माणगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १४ सार्वजनिक व ७४० घरगुती गणरायाचे शुक्रवारी भावपूर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. यावेळी माणगाव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण पाटील व पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



**मुरूड : प्रतिनिधी**

एक दोन तीन चार गणपतीचा जयजयकार, गणपती बाप्पा मोरया....पुढच्या वर्षी लवकर या अशा भावपुर्ण घोषणा देत मुरुड पोलीस ठाणे हद्दीतील १८९१ गणपतीचे शुक्रवारी समुद्रात विसर्जन करण्यात आले. मुरुड शहरात शुक्रवारी दुपारपासूनच ढोलताशांच्या गजरात, फटाक्यांची आतिषबाजी करीत गणरायांच्या विसर्जन मिरवणुका काढण्यात आल्या होत्या. या वेळी गणेशभक्तांच्या उत्साहाला उधाण आले होते. गणपती बाप्पा मोरया... मंगलमुर्ती मोरया म्हणत, आरती करत बाप्पाला निरोप देण्यात आला. डॉ. राज कल्याणी यांनीसुद्धा आपल्या बाप्पांचें श्रद्धापूर्वक विसर्जन केले. या वेळी मुरुड समुद्र किनारी गर्दी झाली होती.

## मुरूड समुद्रकिनारी वाहून आलेल्या मूर्तीचे श्रीसदस्यांकडून पुन्हा विसर्जन

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील गणेशभक्तांनी शुक्रवारी मुरुड समुद्र किनारी दहा दिवसांच्या श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन केले होते. त्यापैकी काही श्रीगणेश मुर्ती पुन्हा समुद्राच्या लाटेने किनाऱ्याजवळ आल्या होत्या. श्री सदस्यांनी किनाऱ्यावर आलेल्या गणेशमुर्त्या गोळा करून त्यांचे पुन्हा खोल समुद्रात विसर्जन केले.



दहा दिवसांच्या गणेश मूर्ती आकाराने मोठ्या व उंच असतात. या गणेशमुर्तींचे शुक्रवारी मुरूडच्या समुद्रात विसर्जन करण्यात आले होते. त्यापैकी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या २५६ श्रीगणेशमुर्ती भरतीच्या वेळी पुन्हा समुद्र किनाऱ्यावर आल्या. त्याची माहिती मिळताच मुरूडमधील ४५ श्रीसदस्यांनी समुद्र किनारी येऊन वाहून आलेल्या श्रीगणेश मुर्ती गोळा केल्या व पुन्हा खोल समुद्रात विसर्जित केल्या.

# गणेश विसर्जन मिरवणुका पाहण्यासाठी रोह्यात भाविकांची गर्दी


**धाटाव : प्रतिनिधी**

तालुक्यात अनंत चतुर्दशीच्या सुमार एक हजार बाप्पांचे शुक्रवारी भावपुर्ण वातावरणात विसर्जन करण्यात आले. पावसाच्या सरींचा आनंद घेत टाळ, मदुंग आणि ढोल, ताशांच्या गजरात भक्तगणांनी पुढच्या वर्षी लवकर या म्हणत आपल्या अवडत्या बाप्पाला निरोप दिला. विसर्जन मिरवणुकांचा जल्लोष पाहण्यासाठी रोहा बाजारपेठेत गर्दी झाली होती.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची शुक्रवारी दुपारनंतर गणेश विसर्जनासाठी लगबग सुरू झाली होती. मोरे आळी, अंधार आळी आणि धनगर आळी असे एकामागून एक गणपती विसर्जनासाठी काढण्यात आले. रोह्याचा प्रसिद्ध एक गाव एक सार्वजनिक गणपती, जय गणेश मंडळाचा भुवनेश्वरचा राजा, तसेच शहरातील शेडगे बंधु, साळवी बंधु आदिं गणपतींच्या भव्य विसर्जन मिरवणुका पाहण्यासाठी रोहा बाजारपेठेत गर्दी उसळली होती. रमेश साळवी, वखारदार बंधु, दीपक कोरपे, पिळवणकर, अपेंद्र बाबू सावंत, संजय अवसरकर, मोकल, दीपक गोलिपकार, बांदल परिवार, राजू सकपाळ आदी उत्कृष्ट सजावटीच्या भव्य गणेशमूर्तींचे त्या त्या आळींतील इतर गणपतींसह मिरवणुकीने वाजत गाजत, लेझिम, टाळ मदुंग आणि ढोल ताशाच्या गजरात विसर्जन करण्यात आले. हातगाडी तसेच खाजगी वाहनांतून विसर्जनासाठी निघालेल्या बाप्पांना पाहण्यासाठी मोठा जनसमुदाय लोटला होता. गणपती विसर्जनासाठी नगरपालिके तर्फे विसर्जन स्थळांवर योग्य ती व्यवस्था करण्यात आली होती. भक्तगणांनी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या असे गजर करीत आपल्या बाप्पांचे कुंडलिका नदी पात्रात भावपुर्ण आणि भक्तीमय वातावरणात शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत विसर्जन केले.

### बंदर पकटीचा मार्ग बंद केल्याने विघ्न

**रोहा शहरातील बंदर पकटीवर मध्यम तसेच मोठ्या गणेशमूर्त्यांचे विसर्जन करण्याची पुर्वपार परंपरा आहे. विसर्जनासाठी येणाऱ्या गणरायांची त्या त्या हातगाड्यांवरच आरती करून मूर्तीचे विसर्जन केले जात असते. यंदा पोलिसांनी बंदर पकटीचा मार्ग बंद केल्याने गणेशमुर्त्यांना जमिनीवर उतरवून हातगाड्या बाहेर काढाव्या लागल्या. बाप्पांची मूर्ती जमिनीवर ठेवून आरत्या कराव्या लागल्या. त्यामुळे गणेशभक्तांचा मोठा हिरमोड झाला. या प्रकाराबद्दल भाविक नाराजी व्यक्त करीत होते. सदर विषय पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्याकडे मांडला असता, त्यांनी पुढील वेळी गणेश विसर्जनात कुठल्याही स्वरूपाची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे स्पष्ट केले.**



# कर्जतमध्ये गणेशोत्सव मंडळातर्फे चित्रकला स्पर्धा, समरगीत सादरीकरण



**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून कर्जत येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा व समरगीत सादरीकरणाचे आयोजन केले होते. या दोन्ही उपक्रमांना प्रतिसाद लाभला.

कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात झालेल्या या स्पर्धेत विविध शाळांनी भाग घेतला होता. पारितोषिक वितरण समारंभ नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या हस्ते झाला.

समरगीत सादरीकरण करणाऱ्या शाळांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले, तर चित्रकला स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

नगराध्यक्ष जोशी, माजी नगरसेवक भालचंद्र जोशी, जेष्ठ पत्रकार विजय मांडे, संतोष पेरणे यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजाभाऊ कोठारी यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष आशिष गोखले, अभिजीत मराठे, सदानंद जोशी, निलेश परदेशी, पंकज शहा, गणेश ठोसर, अमित मराठे, बंटी लोवंसी आदींसह शिक्षक व विद्यार्थी या वेळी उपस्थित होते. सर्वांनी आनंद व्यक्त केला.

### चित्रकला स्पर्धा निकाल

**पहिला गट : पाचवी ते सातवी**

**प्रथम :** अपर्णा कांबळे, गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूल
**द्वितीय :** मेहनुर शेख, विद्याविकास मंदिर
**तृतीय :** वेदांत हरपुडे, अभिनव ज्ञान मंदिर
**उत्तेजनार्थ :** इशिका लोवंसी

**दुसरा गट : आठवी ते दहावी**

**प्रथम :** प्रथमेश लाड, कर्जत इंग्लिश मिडीयम स्कूल
**द्वितीय** : तृप्ती हंकारे, गुड शेफर्ड कॉन्व्हेंट स्कूल
**तृतीय :** प्राची घोलप, कर्जत इंग्लिश मिडीयम स्कूल
**उत्तेजनार्थ** : यश पाटणकर, डोंबे विद्या निकेतन

